जगात आज असा एकही देशनाही, कि जेथे सांगलीच्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी नाही. `आम्ही अभियंते घडवतो` म्हणणारे हे महाविद्यालय प्रत्यक्षात देश घडविण्याचे काम करीत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले कॉलेज ८० वर्षांचे `तरुण` आहे.

# वालचंद अभियांत्रिकी

'वुई बिल्ड द नेशन.. वुई बिल्ड द वर्ल्ड' अर्थात 'आम्ही राष्ट्र घडवतो.. आम्ही जग उभारतो' अशी बिरुदावली जगभरातील अभियंते अभिमानाने मिरवतात. अशा शे-दोनशे नव्हे तर तब्बल २५ हजारांवर अभियंत्यांना घडविणारी संस्था म्हणजे सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय. कर्मसु कौशलम् हे ब्रीद घेऊन धोंडूमामा साठे यांनी स्थापन केलेले न्यू इंजिनिअरिंग कॉलेज म्हणजेच आजचे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय. अनेक अडचणींवर मात करीत स्वातंत्र्यपुर्व भारतामध्ये सुरू झालेले हे पहिले खासगी महाविद्यालय आज सांगलीचा लौकिक वाढवत आहे.



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाची प्रशासकीय इमारत. (छाया : नंदकिशोर वाघमारे)



**सांगलीज् प्राईड**

दत्तात्रय शिंदे

सांगलीचे 'एज्युकेशन हब' बनलेल्या विश्रामबाग परिसरात नव्वद एकरावर वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा 'कॅम्पस' पसरलेला आहे. संस्थापक धोंडूमामा साठे पुण्यातील शिक्षणक्षेत्रात नावाजलेले व्यक्तिमत्त्व. १९४५च्या सुमारास त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचे ठरवले. सुरुवातीस पुण्यातच महाविद्यालय सुरू करण्याचा त्यांचा मनोदय होता. मात्र पुण्यात पूर्वीच एक अभियांत्रिकी महाविद्यालय असल्याने तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सोय होईल, या विचाराने त्यांनी सांगलीची निवड केली. त्यासाठी महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबई विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला. सांगलीमध्ये येऊन संस्थानचे तत्कालीन शिक्षणमंत्री बी. एस. तथा बाळासाहेब कोरे यांची भेट घेतली. उदारीकरणाचे धोरण राबविणाऱ्या सांगली संस्थाननेही त्यांना साथ दिली. सांगलीचे राजे चिंतामणराव पटवर्धन यांनी आर्थिक मदत देऊ केली. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांनी विकायला काढलेली सैनिक कॅम्पची विलिंग्डन महाविद्यालयासमोरील जागा धोंडूमामांनी घेतली. ६ नोव्हेंबर १९४६ रोजी नियंत्रण मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद गोविंद मराठे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. २३ मार्च १९४७ रोजी इमारतीची मुहूर्तशिला सांगली संस्थानच्या राणीसाहेब सरस्वतीदेवी पटवर्धन यांच्या हस्ते बसविण्यात आली. तर २३ जून १९४७ रोजी महाविद्यालयातील शिक्षणास प्रारंभ झाला. यानंतर २९ नोव्हेंबर १९४७ रोजी इमारतीचे अधिकृत उद्घाटन मुंबई इलाख्याचे पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या हस्ते झाले.

सुरुवातीस या महाविद्यालयाचे नाव 'न्यू इंजिनिअरिंग कॉलेज, सांगली असे होते. पहिल्या वर्षी केवळ ३० विद्यार्थी क्षमतेसह स्थापत्य अभियांत्रिकी शाखेस परवानगी मिळाली. पुढे हा व्याप वाढत गेला. यादरम्यान संस्थेसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. यावेळी वालचंद समूहाने मदत देऊ केली. १९५५ मध्ये शेठ वालचंद हिराचंद यांचे नाव महाविद्यालयास देण्यात आले. तेव्हापासून हे महाविद्यालय वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून ओळखले जाऊ लागले. १९५६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या पुढाकाराने राज्य व केंद्र सरकारच्या निर्देशानुसार महाविद्यालयाचे व्यवस्थापन वालचंद-हिराचंद मेमोरिअल ट्रस्टच्या सहभागातून स्थापन करण्यात आलेल्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलकडे हस्तांतरित करण्यात आले. यानंतर सिव्हिलसोबत मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरू झाले.

पुढील काळात शिक्षणाचा हा व्याप वाढतच गेला. १९७० मध्ये सध्याची प्रशासकीय इमारत आकाराला आली. २००७ मध्ये वालचंद-हिराचंद मेमोरिअल ट्रस्टच्या माध्यमातून अद्ययावत अजित गुलाबचंद सेंट्रल लायब्ररी उभारण्यात आली. सध्या महाविद्यालयात ६ पदवी, १० पदव्युत्तर, तर ४ पदविका अभ्यासक्रम सुरू आहेत. एकूण ७४० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असलेल्या या महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये सध्या २८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. देशातील आघाडीच्या स्वायत्त महाविद्यालयांमध्ये 'वालचंद'चे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

अध्यक्ष अजित गुलाबचंद व ॲडमिन्स्ट्रेटिव्ह कौन्सिलच्या नेतृत्वाखाली आधुनिक शिक्षणाची कास धरलेल्या या महाविद्यालयात दोनशेहुन अधिक शिक्षकेतर कर्मचारी आहेत. १६०हून अधिक शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. यापैकी ४५ शिक्षक पीएच.डीधारक आहेत. सध्या प्राचार्य उदयकुमार दबडे येथील जबाबदारी सांभाळतात. व्यवस्थापनाने प्रत्येक शिक्षकास लॅपटॉप दिला आहे. शिक्षकांना संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी तब्बल तीन लाख रुपयांची मदत दिली जाते. तब्बल २७ पेटंट महाविद्यालयातील शिक्षकांच्या नावावर आहेत. आणखी पाच पेटंट मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत, तर आणखी ४० पेटंट प्रक्रियेमध्ये आहेत.

नव्वद एकराच्या विस्तीर्ण कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांसाठी सर्व त्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शंभर विद्यार्थी क्षमतेच्या दहा हॉस्टेल ब्लॉकमध्ये एक हजारावर विद्यार्थ्यांची राहण्याची सोय आहे. अद्ययावत प्रयोगशाळा, २४ तास खुले ग्रंथालय, विस्तीर्ण मैदान, संपूर्ण कॅम्पसमध्ये मोफत वायफाय यासह विविध शैक्षणिक सुविधांमुळे महाविद्यालयाचा राज्यभरात लौकिक आहे. देश-विदेशातील नामवंत कंपन्या येथील विद्यार्थ्यांना सेवेत घेण्यासाठी उत्सुक असतात.

## गतवर्षी पाच विद्यार्थी युपीएससीमध्ये चमकले

वालचंदचे २५ हजारावर माजी विद्यार्थी जगभरातील ४९ देशांमध्ये पसरले आहेत. तीनशेहून अधिक माजी विद्यार्थी ख्यातनाम कंपन्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक अशा जबाबदार पदांवर कार्यरत आहेत. एमपीएससी-युपीएससी अशा स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातुन प्रशासनात सेवा बजावत आहेत. गतवर्षी महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवले आहे. दोन हजारावर विद्यार्थ्यांनी स्वतंत्रपणे व्यवसाय उभारत नाव कमावले आहे. 'वालचंद'च्या पर्यायाने सांगलीच्या लौकिकात भर घातली आहे. देश उभारणीत सिंहाचा वाटा उचलत आहे. `वुई मेक इंजिनीअर्स` म्हणत वाटचाल सुरु आहे.

# विद्यार्थ्यांसाठी सॉफ्ट स्किल गरजेचे

## आशिष वैष्णव : 'वालचंद'च्या १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. ६ : 'इंजिनिअरिंग करणारी मुले हुशार आहेत. मात्र, त्यांना सॉफ्ट स्किल देणे गरजेचे आहे,'' असे मत थरमॅक्स कंपनीच्या सेल्स विभागाचे ग्लोबल हेड आशिष वैष्णव यांनी व्यक्त केले. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवारी (ता. ६) १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते.

महाविद्यालयाच्या टिळक सभागृहात सायंकाळी हा कार्यक्रम झाला. या वेळी मध्य प्रदेश येथील सायबर विभागाचे पोलिस महासंचालक निरंजन वायंगणकर, 'एचएएल'चे संचालक तथा उद्योजक दीपक शिंदे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष तथा उद्योजक श्रीनिवास पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. उदय दबडे, कार्पोरेट रिलेशन अँड स्टुडंट वेलफेअरचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

१९९४ मध्ये वडिलांसमवेत प्रवेश घेण्यासाठी इथे आलो आणि वालचंद कॅम्पस आवडल्याचे श्री. वैष्णव यांनी सांगितले. श्री. वायंगणकर म्हणाले, ''ज्यांनी मला घडवले, ते 'वालचंद' आहे. 'वालचंद'ने मला टेक्नॉलॉजी कशी वापरायची, हे शिकवले. त्यामुळेच दरोडेखोरांवर कारवाई करू शकलो. तसेच शासकीय प्रणालीपासून बाजूला झालेल्या विचार पद्धती मोडीत काढण्यासाठी अधिकाधिक नक्षलींचे समर्पण करून घेतले.''

''मी नेहमी येत नसलो तरी, 'वालचंद'चे आकर्षण कायम आहे. हिरे घडवण्याचे काम 'वालचंद' करते. बुद्ध्यांकापेक्षा भावनांक महत्त्वाचा आहे,'' असे दीपक शिंदे म्हणाले. श्री. पाटील यांनी 'वालचंद' एक चळवळ असल्याचे सांगितले. देशात वेगळेपणाचा आदर्श निर्माण केला आहे. आता 'वालचंद'ला काहीतरी देण्यासाठी आपण पुढाकार घेऊ,'' असेही ते म्हणाले.

प्रा. दबडे आणि प्रा. धायगुडे यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या उपक्रमांबाबत माहिती दिली. प्रा. धायगुडे यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमासाठी मदत करणाऱ्या दानशूरांचा उल्लेख करत गौरवोद्गार काढले. मेळाव्यात सदानंद जोशी यांनी पाच लाख रुपयांची देणगी दिली असून यातून विद्यार्थ्यांसाठी कौशल्यपूर्ण उपक्रम राबवले जाणार आहेत. १९९९ बॅचचे विद्यार्थी तथा २० वर्षांपासून महाविद्यालयातच कार्यरत मधुकर वावरे यांची 'यूजीसी'च्या जॉईंट सेक्रेटरीपदी निवड झाल्याने आशिष वैष्णव यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. वसुंधरा पवार हिने गणेशवंदना सादर केली. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले. नियामक मंडळाचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, अमोल चव्हाण, चकोर गांधी यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवारी माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना उद्योजक दीपक शिंदे. या वेळी (डावीकडून) आशिष वैष्णव, श्री. शिंदे, श्रीनिवास पाटील, प्रा. संजय धायगुडे, प्रा. उदय दबडे, निरंजन वायंगणकर.

# पराभवाने खचलो; पण हटलो नाही

## संभाजीराजे छत्रपती : 'वालचंद'च्या 'युवारंग'मध्ये विद्यार्थ्यांशी हितगुज

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ७ : "लोकसभेची २००९ ची निवडणूक मी कोल्हापुरातून लढलो. निवडणुकीसाठी लागणारे पैसे देणार नाही, असे वडिलांनी आधीच सांगितले होते. निवडणूक हरलो, पैसेही संपले, त्यामुळे आत्मविश्वासाचे खच्चीकरण झाले; मात्र छत्रपती शिवाजी महाराज आणि शाहू महाराजांची शिकवण हीच ताकद बनली. पुन्हा सामाजिक कार्यात सक्रिय झालो, अशी आठवण सांगताना माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आज भावनिक झाले.



सांगली : 'युवारंग'च्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना संभाजीराजे छत्रपती. मुलाखत घेताना सर्वज्ञ मोरे.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आर्ट सर्कल आयोजित 'युवारंग २०२४'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'हितगुज माझ्या राजाशी' या विशेष कार्यक्रमांत सर्वज्ञ मोरे यांनी त्यांची मुलाखत घेतली. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल सुर्वे, आर्ट सर्कल सल्लागार प्रा. किरण मधाळे यांची उपस्थिती होती. संभाजीराजे छत्रपती म्हणाले, "लोकसभा निवडणूक हरल्यानंतर राजवाड्यात कोंडून घ्यावे आणि थांबून सामाजिक कार्याचे दरवाजे बंद करावेत, असे ठरवले होते. संयोगिताराजेंनी 'युवराज राजवाड्याचे की, देशाचे व्हायचे, हे ठरवा' असे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेवेळी झालेला त्रास आणि शाहू महाराजांना पुरोगामी चळवळ उभी करताना झालेला त्रास आठवला. तेव्हा पुन्हा सामाजिक जीवनात यायचे ठरवले. मी ज्या निवडणुकीत पराभूत झालो, त्यात राजेशाही थाट मला अडचणीचा ठरला. त्याचा फटका बसला. तेव्हा कळाले, कष्टाशिवाय फळ मिळत नाही." ते म्हणाले, "आई-वडिलांप्रमाणे आजी-आजोबा मायाळू होते. वडील कडक; पण कॉलेजमध्ये गेल्यावर थोडी सुट मिळाली. लहानपणी राजकोटला मला वडील सोडायला आले की, पुन्हा चार महिने भेट होणार नाही, म्हणून आपोआप डोळ्यांत अश्रू यायचे. त्यावेळी सहजतेने वडिलांना कधी मिठी मारायचो. त्यानंतर खासदार झाल्यावरच वडिलांना मिठी मारली होती." महापुरावर पुस्तक लिहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### संस्काराचा 'सेटअप' ठरलेला

■ "राजघराण्यात संस्काराचा एक 'सेटअप' ठरलेला असतो. त्या माध्यमातून माझी वाटचाल झाली. विचारसरणी, दृष्टिकोन ही लाईन ठरलेली असते. त्यानुसार वागावे लागते. लहानपण कोल्हापूर, गुजरात येथे गेले. शाळा, महाविद्यालयात जातानाही गाडी, हुजरे सोबत असायचे. सुरवातीची तफावत आता कमी होत आहेत. हे बदल व्हावेत, या मताचा आहे. जो मला त्रास होतो. मला जी वडिलांच्या बाबतीत आदरयुक्त भीती आहे. या गोष्टी नैसर्गिक होतात. मात्र अनेकदा आपल्याला मनातल्या गोष्टी बोलू शकत नाही. माझ्या मुलाच्या बाबतीत ही गोष्ट मी मोडीत काढल्या आहेत," असे संभाजीराजे म्हणाले.



**कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.उदय म्हसकर , सचिन चव्हाण यांच्यासह उपस्थित मान्यवर.**

# सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात -कार्यशाळेस सुरवात

**जनप्रवास । सांगली**

वालचंद महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स विभागामध्ये ए.आय.सी.टी.ई ./अटल अकॅडमी, नवी दिल्ली तंत्र शिक्षण संचानालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने Emerging Trends in Electric Vehical या विषयावरील कार्यशाळेस प्रारंभ झाला.

दि. १३ जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.उदय म्हसकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यशाळेमध्ये सध्याच्या बहुचर्चित इलेक्ट्रिक व्हेहिकल (EV) च्या बेसिक्सपासून पुढे येणाऱ्या सर्व आव्हानांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या प्रसंगी महाविद्यालयाचे संचालक डॉ.उदय दबडे यांनी मार्गदर्शन केले या कार्यशाळेत अनेक तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत . या कार्यशाळेचे समन्वयक डॉ.सचिन रुईकर यांनी या कार्यशाळेचे उद्देश व भविष्यामध्ये उपलब्ध होणाऱ्या संधी या विषयी प्रबोधन केले.सदर कार्यशाळेसाठी सचिन चव्हाण यांच्यासह समन्वयक म्हणून ते काम पाहत आहेत. सदर कार्यशाळेसाठी विभागातील सर्व अध्यापक व शिक्षेकतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले आहे. कु. श्वेता पाटील यांनी आभार मानले.

पुढारी वर्धापन दिन विशेष
सांगली, गुरुवार, दि. ११ जानेवारी २०२४

# यंग इंडिया





# ‘वालचंद’ नेहमीच अग्रेसर

भारताला स्वातंत्र्याचे वेध लागले असतानाच स्थापन झालेल्या सांगली येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे भारताच्या तंत्रशिक्षण व औद्योगिक क्षेत्रात सातत्याने भरीव योगदान राहिले आहे.

**-प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दृष्टिक्षेपात आल्यानंतर स्वातंत्र्योत्तर भारताच्या औद्योगिक विकासाचा ध्यास घेऊन त्यासाठी प्रयत्न करणारे धाडसी उद्योजक धोंडुमामा साठे यांना ९ जुलै १९४५ रोजी सुचलेल्या एका कविकल्पनेचे प्रत्यक्षीकरण म्हणजेच २३ जून १९४७ रोजी स्थापन झालेले भारतातल्या पहिल्या मोजक्या खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी एक म्हणजेच त्यावेळचे “न्यू इंजिनिअरिंग कॉलेज, सांगली” होय. त्यावेळी खासगी अभियांत्रिकी महाविद्यालय चालविणे हे तितके सोपे नव्हते व त्यामध्ये प्रचंड अडचणी येऊन महाविद्यालय बंद करावे लागते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली असतानाच, अग्रगण्य अशा वालचंद उद्योग समूहाच्या सहकार्यातून सन १९५५ पासून श्री. गुलाबचंद हिराचंद व लालचंद हिराचंद या उद्योजक बंधूंच्या पुढाकारामुळे या महाविद्यालयाचे “वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय” असे पुनरुज्जीवन झाले आणि तेव्हापासून महाविद्यालयाची जोमाने वाटचाल सुरू झाली.

भारतीय उद्योग जगतातील एक अग्रगण्य नाव असलेले श्री. अजित गुलाबचंद यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाची धुरा सन १९९६ मध्ये सांभाळल्यापासून महाविद्यालयाची आधुनिकतेकडे घोडदौड प्रचंड वेगात सुरू झाली. सन १९९७ मध्येच व्ही सॅट इरनेट इंटरनेट कनेक्टिव्हिटी घेणारे वालचंद हे आयआयटी मुंबईनंतरचे महाराष्ट्रातील पहिलेच महाविद्यालय होते.

दूरसंचार क्षेत्रातील बदलानंतर आणि कोव्हिड - १९ नंतर पूर्णतः बदललेल्या शैक्षणिक विश्वाच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या अमृतकाळातील “यंग इंडिया” घडविण्यासाठी आजच्या तरुणाईच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे उद्दिष्ट बाळगून सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून वालचंद आपले योगदान पूर्ण क्षमतेने देत आहे. महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष श्री. अजित गुलाबचंद आणि सदस्य श्री. अमोल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांच्या नेतृत्वाखाली वालचंदमधील सर्व कर्मचारी वृंद हे नव्या भारताच्या जडणघडणीत कार्यरत आहेत. सुसज्ज क्लासरूम आणि लॅबोरेटरीबरोबरच इंटरप्रीनरशीप इनोव्हेशन ॲन्ड इनक्युबेशन या आजच्या कालसुसंगत क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना वाव देण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था महाविद्यालयाने निर्माण केली आहे.

देशपातळीवरील स्मार्ट इंडिया हॅकेथॉन, इ-यंत्र अशा विविध उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी नेहमीच अग्रेसर आहेत. शैक्षणिक क्षेत्रात अमूलाग्र बदल आणण्याच्यादृष्टीने तयार केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (एनइपी २०२०) च्या अंमलबजावणीमध्ये महाविद्यालय हे अग्रेसर आहे. भारतातील अन्य अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी एनइपी २०२० रोल मॉडेल बनण्याचा मानस प्रा. डॉ. उदय दबडे यांनी बोलून दाखविला. कृत्रिम बुध्दिमत्ता क्षेत्रात “प्रगत संशोधन केंद्र” (सेंट्रल ऑफ एक्सलन्स) उभारण्याच्यादृष्टीने काम सुरू असून लवकरच ते प्रत्यक्षात येईल, असेही त्यांनी सांगितले. नवीन प्रगत क्षेत्रात अभ्यासक्रम सुरू करणे आणि वालचंद तंत्रशास्त्र विद्यापीठामध्ये रूपांतर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पाटील क्रिटिकेअर हॉस्पिटल, इस्लामपूर
आय.सी.यु. (I.C.U.) सेंटर | आंतररुग्ण सेवा | अत्यावश्यक २४ तास सेवा
दैनिक पुढारी वर्धापनदिनास हा·र्दि·क·शु·भे·च्छा

दैनिक पुढारी वर्धापनदिनास हा·र्दि·क·शु·भे·च्छा
वाळवा तालुका इंजिनिअर्स असोसिएशन
उरुण-इस्लामपूर

दैनिक पुढारी वर्धापनदिनास हा·र्दि·क·शु·भे·च्छा
चौगुले हॉस्पीटल
लेसर प्रोक्टोस्कोपी विभाग व अत्याधुनिक एंडोस्कोपी विभाग
डॉ. उमेश बापूसो चौगुले
डी.एन.बी.एम.एन.ए.एम.एस.
एफ.ए.आय.एस.एफ एम.एस.
डॉ. सौ. विद्या उमेश चौगुले
एम.बी.बी.एस.डी.जी.ओ.
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ
सर्जिकल, मॅथर्निटी, एंडोस्कोपी व लॅप्रोस्कोपी सेंटर
पत्ता : ओंकार कॉलनी, माणकेश्वर चित्रमंदिर समोर, इस्लामपूर
जि. सांगली ४१५ ४०९ फोन नं. ०२३४२-२२५३७५



# 'युवारंग २०२४' राज्यस्तरीय कला महोत्सव उत्साहात

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आर्ट सर्कलच्या विद्यार्थी समुहाने आयोजित केलेला 'युवारंग २०२४' मोठ्या उत्साहात साजरा झाला. युवारंग २०२४ मध्ये सालाबादप्रमाणे विविध स्पर्धा व कला प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

युवराज संभाजीराजे छत्रपतींच्या हस्ते युवारंग २०२४ चे उद्घाटन युवराज संभाजीराजे छत्रपती महाराज साहेबांच्या हस्ते करण्यात आले. सर्वज्ञ मोरे यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी डॉ. उदय दबडे, डॉ. अनिल सुर्वे, प्रा. किरण मधाळे उपस्थित होते. यावेळी 'हितगुज माझ्या राजाशी....' या उपक्रमांतर्गत युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्याशी सर्वज्ञ मोरे यांनी संवाद साधला.

याअंतर्गत विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यात एकल अभिनय, स्टॅण्डअप, एकलनृत्य, समूहनृत्य, रांगोळी, वक्तृत्व, एकलवादन, एकलगायन,

## वालचंदमध्ये विजेत्यांना बक्षिस वितरण



सांगली : वालचंद महाविद्यालयात युवारंग राज्यस्तरीय कला महोत्सवांतर्गत विजेत्यांना बक्षिस देताना उपविभागीय पोलीस अधिकारी प्रणिल गिल्डा व इतर.

स्वरचितकविता, रेखाटन, छायाचित्रण, रीलमेकिंग, इ. यासर्व स्पर्धामध्ये महाराष्ट्र व आसपासच्याराज्यांतूनजवळपास ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. आर्टसर्कलचे उपाध्यक्ष ऋतुराज चिकुर्डे, सचिव प्रज्वल तायडे, तसेच प्रथम पाटील, निकिथा कामथ, श्रेया पाटील, वसुंधरा पवार, मनस्वी नेवले, किरण कांबळे यांच्यासोबत आर्टसर्कलच्या सर्व विद्यार्थ्यांनी यास्पर्धेचे यशस्वी आयोजन उत्तम प्रकारे केले. युवारंगस्पर्धांतील विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे : एकल अभिनय पार्थ देसाई , तन्मय राऊत ; स्टॅण्डअप – तेजस सपकाळ , मिहिर आंबवडे ; एकलनृत्य – सानिका कुलकर्णी, आशिष घडशी ,समूहनृत्य आकाश उकली, सायली कुलकर्णी; रांगोळी – मुहसिर मोमीन, राज गुजनाळे ; वक्तृत्व ऋतुजा पाटील, विशाल ठक्कर एकलवादन – निनाद कुलकर्णी, सौरभ आदमाने; एकलगायन – ओमकार धुमाळ, विशारद तमायाचे, स्वरचितकविता भारत जीवन प्रभुखोत, पार्थ देसाई, रेखाटन प्राशिक पाटील, विराज सुर्वे, छायाचित्रण – सानिया पोतदार, आदित्य मोहिते, रीलमेकिंग – निहाल तांबोळी , सुजल मोहिते.

पारितोषिक वितरण पोलिस अधिक्षक डॉ. बसवराज तेली, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रणिल गिल्डा यांच्या हस्ते तसेच डॉ. अनिल सुर्वे, प्रा. किरण मधाळे यांच्या हस्ते बक्षिस वितरण झाले. आर्टसर्कल अध्यक्ष सर्वज्ञ मोरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी 'राधा ही बावरी' फेम स्वप्नील बांदोडकर यांच्या लाईव्हकॉन्सर्ट आयोजित केला होता. या लाईव्हकॉन्सर्टमध्ये 'सूर नवा ध्यास नवा' फेम ईशानी पाटणकर, झीयुवा संगीतसम्राट आगोष मोहिते यांच्यासह इतर सहकलाकारांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# 'वालचंद'मध्ये रंगला युवारंग महोत्सव

## स्वप्नील बांदोडकर यांच्या 'लाईव्ह कॉन्सर्ट'ने कार्यक्रमाची सांगता



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील युवारंगमधील स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करताना उपविभागीय पोलिस अधिकारी प्रणिल गिल्डा.

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. १४ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील आर्ट सर्कलतर्फे आयोजित 'युवारंग' कार्यक्रम उत्साहात झाला. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते उद्‍घाटन झाले. पोलिस अधीक्षक बसवराज तेली यांच्याहस्ते बक्षीस वितरण झाले. 'राधा ही बावरी..' फेम स्वप्नील बांदोडकर यांच्या 'लाईव्ह कॉन्सर्ट'ने सांगता झाली.

'रंग कलांचे, बंध युवांचे' युवामहोत्सवात सहा कलाप्रकारांत १६ स्पर्धा झाल्या. त्याचा निकाल पुढीलप्रमाणे (विजेता, उपविजेता) : एकल अभिनय - पार्थ देसाई, तन्मय राऊत, स्टँड अप - तेजस सपकाळ, मिहिर आंबवडे, एकल नृत्य - सानिका कुलकर्णी, आशिष घडशी, समूह नृत्य - आकाश उकली, सायली कुलकर्णी, रांगोळी - मुद्दसीर मोमीन, राज गुंजनाळे, वक्तृत्व - ऋतुजा पाटील, विशाल ठक्कर, एकल वादन - निनाद कुलकर्णी, सौरभ आदमाने, एकल गायन - ओंकार धुमाळ, विशारद तमयाचे, स्वरचित कविता - भारतजीवन प्रभुखोत, पार्थ देसाई, रेखाटन - प्राशिक पाटील, विराज सुर्वे, छायाचित्रण - सानिया पोतदार, आदित्य मोहिते, रील मेकिंग - निहाल तांबोळी, सुजल मोहिते.

महाविद्यालयात स्वप्नील बांदोडकर यांची 'लाईव्ह कॉन्सर्ट' झाली. यामध्ये 'सूर नवा-ध्यास नवा' फेम ईशानी पाटणकर, युवा सम्राट आमोष मोहिते यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. या वेळी सांगलीचे खासदार संजय पाटील यांचा सत्कार करण्यात आला. 'आर्ट सर्कल'चे सर्वज्ञ मोरे यांनी नियोजन केले. त्यांना महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल सुर्वे, सल्लागार प्रा. किरण यांनी मार्गदर्शन केले. पारितोषिक वितरणप्रसंगी पोलिस उपाधीक्षक प्रणील गिल्डा यांची उपस्थिती होती.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये 'स्यूडो'सह लोडिंग फ्रेम सिस्टिमचे उद्घाटन

सांगली, ता. ३१ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात उपयोजित यांत्रिकी विभागामध्ये 'स्यूडो-डायनॅमिक' चाचणी सुविधेसह लोडिंग फ्रेमचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्याहस्ते झाले. व्यवस्थापन परिषद सदस्य अमोल चव्हाण, संचालक डॉ. उदय दबडे, प्रा. श्रीरंग तंडे, सचिन कदम यांची या वेळी उपस्थिती होती.

नवी दिल्ली येथील विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थेमध्ये पायाभूत सुविधा सुधारण्यासाठीच्या निधी अंतर्गत याची उभारणी करण्यात आली आहे. स्ट्रक्चरल सिस्टिमवरील विविध धोक्यांच्या प्रभावांचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी याची उपयुक्तता आहे. 'डीटीएस-फस्ट'ने



सांगली : 'वालचंद'मध्ये कार्यक्रमाच अनिल काकोडकर, अमोल चव्हाण व अन्य.

१ कोटी ३ लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. यात 'डीटीएस' आणि 'वालचंद' यांचा ५०:५० टक्के सहभाग असेल.

सर्वसमावेशक अभ्यास आणि प्रयोगांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या विस्थापन आणि बल नियंत्रित अशा दोन्ही पद्धतींमध्ये भार लागू करण्यास सक्षम करणाऱ्या ॲक्ट्युएटरची सुविधा प्रदान करते. २००० केएन आणि १००० केएन क्षमतेचे दोन अनुलंब ॲक्ट्युएटर लोडिंग परिस्थितीच्या विस्तृत श्रेणीचे अनुकरण करण्यासाठी अष्टपैलुत्व प्रदान करतात.

२०० केएन क्षमतेचा लॅटरल स्यूडो-डायनॅमिक ॲक्ट्युएटर सायनसॉइडल, पिरियॉडिक किंवा रॅम्प लोड्ससह डायनॅमिक लोडिंग परिस्थितीचे अनुकरण करण्यास मदत करतो. ही सुविधा कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले (यूएसए) द्वारे विकसित केलेल्या पीअर भूकंपाच्या डेटाबेसमधील वास्तविक भूकंपाच्या वेळेच्या इतिहासाच्या नोंदी असलेल्या संरचनेचे अनुकरण करू शकते, ज्यामुळे संशोधकांना भूकंपाच्या घटनांना संरचनेच्या प्रतिसादाचा मोजमाप पद्धतीने अभ्यास करणेसाठी वापरता येईल.

आयोजित केले आहे.

# वालचंद अभियांत्रिकीत 'स्यूडो'सह लोडिंग फ्रेम सिस्टीमचे उद्‌घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात उपयोजित यांत्रिकी विभागामध्ये 'स्यूडो-डायनॅमिक' चाचणी सुविधेसह लोडिंग फ्रेमचे उद्‌घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते झाले. व्यवस्थापन परिषद सदस्य अमोल चव्हाण, संचालक डॉ. उदय दबडे, प्रा. श्रीरंग तंडे, सचिन कदम यांची यावेळी उपस्थिती होती.

नवी दिल्ली येथील विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थेमध्ये पायाभूत सुविधा सुधारण्यासाठीच्या निधी अंतर्गत याची उभारणी करण्यात आली आहे. स्ट्रक्चरल सिस्टीमवरील विविध धोक्यांच्या प्रभावांचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी याची उपयुक्तता आहे. 'डीटीएस-फस्ट'ने १ कोटी ३ लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. यात 'डीटीएस' आणि 'वालचंद' यांचा प्रत्येकी ५० टक्के सहभाग असेल.

सर्वसमावेशक अभ्यास आणि प्रयोगांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या विस्थापन आणि बलनियंत्रित अशा दोन्ही पद्धतींमध्ये भार लागू करण्यास सक्षम करणाऱ्या अ‍ॅक्ट्युएटरची सुविधा प्रदान करते.

२००० केएन आणि १००० केएन क्षमतेचे दोन अनुलंब अ‍ॅक्ट्युएटर लोडिंग परिस्थितीच्या विस्तृत श्रेणींचे अनुकरण करण्यासाठी अष्टपैलुत्व प्रदान करतात.

२०० केएन क्षमतेचा लॅटरल स्यूडो-डायनॅमिक अ‍ॅक्ट्युएटर सायनसॉइड, पिरियॉडिक किंवा रॅम्प लोड्ससह डायनॅमिक लोडिंग परिस्थितीचे अनुकरण करण्यास मदत करतो. ही सुविधा कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले (यूएसए)द्वारे विकसित केलेल्या पीअर भूकंपाच्या डेटाबेसमधील वास्तविक भूकंपाच्या वेळेच्या इतिहासाच्या नोंदी असलेल्या संरचनेचे अनुकरण करू शकते, ज्यामुळे संशोधकांना भूकंपाच्या घटनांना संरचनेच्या प्रतिसादाचा मोजमाप पद्धतीने अभ्यास करण्यासाठी वापरता येईल.

# तंत्रज्ञान नवीन भारताचा पाया आखणार

## डॉ. उदय निरगुडकर : 'भारत @ २०४७' कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : भारत हे तंत्रज्ञानाचे नवे केंद्र बनत आहे. युवा पिढीने हे तंत्रज्ञान शिकून स्वतःच्या बुद्धी कौशल्याची जोड देऊन '२०४७' भारत निर्माण करा, असे आवाहन जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित 'भारत @२०४७' या सत्रामध्ये ज्येष्ठ पत्रकार तथा NHPC या भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी नवरत्न प्रकल्पातील स्वतंत्र संचालक डॉ. उदय निरगुडकर यांनी विद्यार्थ्यांना आगामी तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. याचे आयोजन सहयोगी अधिष्ठाता विद्यार्थी उपक्रम डॉ. अनिल सुर्वे यांनी केले होते. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी डॉ. निर्गुडकर



**सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात पत्रकार उदय निरगुडकर यांचा सत्कार करताना डॉ. उदय दबडे व इतर.**

यांचा सत्कार केला. या प्रसंगी श्रीनिवास गायकवाड, डॉ. सुनिल ताम्हणकर, डॉ. प्रशांत खरात उपस्थित होते.

डॉ. निर्गुडकर यांनी आपल्या भाषणात आर्टीफिशियल इंटेलीजेंस व माहीती तंत्रज्ञान या क्षेत्रांवर भर दिला. अभियांत्रिकी व आयटी सेक्टर आणि एआय मिळून सकारात्मकदृष्ट्या भारताला जगण्यासाठी कसे अधिक उत्तम स्थान व प्रगत राष्ट्र बनवू शकतात हे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास नियामक मंडळाचे चेअरमन अजित गुलाबचंद, अमोल चव्हाण व प्रा. उदय दबडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सुश्मिता हादिमनी हिची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये निवड

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**



सुश्मिता हादिमनी

येथील शंभर फुटी रस्त्यावरील सुश्मिता सदाशिव हादिमनी हिची सरळसेवा परीक्षेतून सार्वजनिक बांधकाम विभागात वर्ग दोन अधिकारी म्हणून निवड झाली.

ती येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिलमध्ये एम. टेक झाली आहे. गेल्या चार वर्षांपासून ती स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत होती. वडील पाटबंधारेमधील निवृत्त कर्मचारी असून तिने कोणतीही शिकवणी न लावता हे यश मिळवले. त्यांचे मूळ गाव जत आहे.

# तंत्रज्ञान नवीन भारताचा पाया आखणार

## ज्येष्ठ अभ्यासक डॉ. उदय निरगुडकर यांचे 'वालचंद'मध्ये संबोधन

**सांगली : पुढारी वृतसेवा**

तंत्रज्ञान नवीन भारताचा पाया आखणार, असा विश्वास ज्येष्ठ अभ्यासक डॉ. उदय निरगुडकर यांनी व्यक्त केला.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित भारत २०४७ या सत्रामध्ये डॉ. निरगुडकर बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करून त्याची माहिती, आवश्यकता व जुन्या व नवीन संधीबाबत मार्गदर्शन केले.

वालचंद महाविद्यालयामधील टिळक सभागृहामध्ये भारत २०४७ या कार्यक्रमाचे आयोजन सहयोगी अधिष्ठाता विद्यार्थी उपक्रम डॉ. अनिल सुर्वे यांनी केले होते. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी डॉ. निर्गुडकर यांचा सत्कार केला. याप्रसंगी श्रीनिवास गायकवाड, डॉ. सुनील ताम्हणकर, प्रा. डॉ. प्रशांत खरात यांचीही उपस्थिती होती.



**सांगली : प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी डॉ. उदय निरगुडकर यांचा सत्कार केला.**

डॉ. निरगुडकर यांनी भाषणात कृत्रिम गुणवत्ता व माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांचे महत्त्व स्पष्ट केले. भारत तंत्रज्ञानाचे नवीन केंद्र बनत आहे. युवा पिढीला हे तंत्रज्ञान शिकून व स्वत:च्या बुद्धिकौशल्याची जोड देऊन २०४७ च्या भारताच्या निर्मितीसाठी आवाहन केले.

ते म्हणाले, अभियांत्रिकी व माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातून देश अधिक उत्तम व प्रगत राष्ट्र बनवू शकता. कोरोना काळामध्ये मोठमोठ्या देशांचा मृत्युदर ४-५ टक्के होता, तिथे भारतात तो आपले डॉक्टर्स व शास्त्राच्या कौशल्यामुळे १-२ टक्के सीमित राहिल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सत्राला 'वालचंद'च्या विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाचा चांगला प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील पेस क्लबने संयोजन केले. यासाठी नियामक मंडळाचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य अमोल चव्हाण व महाविद्यालयाचे संचालक प्रा. उदय दबडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सुश्मिता हादिमनीची वर्ग दोन अधिकारीपदी



सुश्मिता

सांगली, ता. ८ : येथील शंभर फुटी रस्त्यावरील रहिवासी सुश्मिता सदाशिव हादिमनी हिची सरळसेवा परीक्षेतून सार्वजिनक बांधकाम विभागात वर्ग दोन अधिकारी म्हणून निवड झाली. ती येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिलमध्ये एम.टेक झाली. शिकवणी न लावता यश मिळवले आहे. मूळ गाव जत आहे. शिक्षक, आई, वडील, भाऊ, बहिणीचे मार्गदर्शन मिळाले.

# प्रतापराव पवार यांचे बुधवारी वालचंद महाविद्यालयात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ११ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांचे व्याख्यान होणार आहे. महाविद्यालयाच्या टिळक हॉलमध्ये 'उद्योजक व्हा' या विषयावर बुधवारी (ता. १४) दुपारी अडीच वाजता ते विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधणार आहेत.

'सकाळ सोशल फाउंडेशन'ने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम घेण्यासाठी आर्थिक सहकार्य केले आहे. त्याअंतर्गत महाविद्यालयात



प्रतापराव पवार

व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. महाविद्यालयातील प्रयोगशाळा, ग्रंथालय, सेंटर ऑफ एक्सलन्स यांसह विविध विभागांना ते भेटी देणार आहेत.


या दरम्यान, स्टाफ आणि फॅकल्टींना ते मार्गदर्शन करणार आहेत. 'वालचंद'साठी दुपारी दोन ते पाच वाजेदरम्यान त्यांनी वेळ राखून ठेवला आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी दिली.

# प्रतापराव पवार यांचे आज 'वालचंद'मध्ये व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. १३ : 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांचे उद्या (ता. १४) व्याख्यान होणार आहे. येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात टिळक हॉलमध्ये दुपारी साडेदहा ते साडेअकरा या वेळेत ते 'बोल अनुभवाचे'अंतर्गत विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधणार आहेत. संचालक डॉ. उदय दबडे यांनी ही माहिती दिली.

डॉ. दबडे म्हणाले, ''महाविद्यालयीन जीवनात उद्योजकतेचे धडे गिरवले गेले, तर नोकरीच्या मानसिकतेतून युवकांना बाहेर काढले जाऊ शकते. या भूमिकेतून श्री. पवार मुलांना अनुभवाचे बोल सांगतील. 'सकाळ सोशल फाउंडेशन'ने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीकरिता विविध उपक्रम घेण्यासाठी आर्थिक



प्रतापराव पवार

सहकार्य केले आहे. त्याअंतर्गत महाविद्यालयात जगभरातील तज्ज्ञांशी संवाद घडवून आणण्यासाठी प्रतिवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. व्याख्यानानंतर श्री. पवार महाविद्यालयातील प्रयोगशाळा, ग्रंथालय, सेंटर ऑफ एक्सलन्स यांसह विविध विभागांना ते भेटी देणार आहेत. त्या वेळीही ते विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.''

### 'यिन'तर्फे वृक्षारोपण

व्याख्यानानंतर 'सकाळ'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) तर्फे वृक्षारोपण होणार आहे. वालचंद महाविद्यालयासह शहरातील विविध महाविद्यालयांतील 'यिन'चे प्रतिनिधी या वेळी उपस्थित राहणार आहेत.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात बुधवारी 'यिन' नेटवर्कच्या वतीने सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे, प्रशिक्षण आणि आस्थापना विभागाचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, नावीन्यता आणि उद्यमशीलता विभागाचे अधिष्ठाता डॉ. बशीरअहमद मोमीन, 'यिन'चे जिल्हा संघटक पृथ्वीराज चव्हाण आदी उपस्थित होते.

# भारतातील तंत्रकुशल मनुष्यबळाची जगाला गरज

>> पान १ वरून

ते म्हणाले, ''येत्या काळात केवळ कृत्रिम बुद्धिमत्तेची भांडवली बाजारपेठ १४ ते १५ ट्रिलियनची असेल. त्यातील निम्मं मार्केट बळकावून २०३० पर्यंत अमेरिकेला मात देण्याचा चीन विचार करतो आहे. आपण सगळे मिळून पाच ट्रिलियन इकॉनॉमीचे उद्दिष्ट ठेवून महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. जगभरातील प्रगत देश त्यांची प्रगती करीत आहेत, ते उद्योग-शिक्षण यातील गुंतवणुकीतून. आपले लक्ष मात्र त्याऐवजी दुसरीकडेच आहे. गेली वीस वर्षे आम्ही 'एज्युकॉन'च्या माध्यमातून जगभरातील विविध शिक्षण संस्थांशी विचारांची देवाणघेवाण घडवून आणत आहोत. तेथील विद्यापीठे, महाविद्यालये काय करतात, याकडे आपले लक्ष हवे. आज आपल्याकडे क्षमता आहे; मात्र तिचा उपयोग करणारी व्यवस्था नाही. आपण जरूर आर्थिक प्रगती करू, मात्र ती सरकारच्या माध्यमातून नव्हे तर तुम्हा विद्यार्थ्यांच्या माध्यमातून करणार आहात. सेवा, उद्योग, पुरवठादार देश म्हणून जग आपल्याकडे पाहतेय. तुम्ही जगात कोठेही जा. तेथे नोकरी करा, उद्योग करा. जगातील अनेक उद्योगांना आपला विस्तार करण्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. आम्ही मराठा चेंबरच्या वतीने जगभरातील अशा १६ उद्योजकांना भारतातून विस्ताराला वाव मिळवून दिला आहे. अशा कुशल मनुष्यबळातून असे उद्योग भारतात विस्तारण्याची, ते खरेदी करण्याची संधी आपल्याला मिळणार आहे. त्यासाठी आपल्याला काय करावे लागेल, याचा विचार करा आणि कृतिशील व्हा.''

ते म्हणाले, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे इंग्रजी कच्चे असते. माझेही होते. मलाही फर्ग्युसन महाविद्यालयात कच्च्या इंग्रजीमुळे शून्यापासून सुरुवात करावी लागली. आपल्याला एखादे कौशल्य येत नाही, यात आपला दोष नसतो. मात्र ते शिकून घेणे आपल्या हाती असते. इंग्रजी माध्यमात शिकलेल्या मित्रांच्या मदतीने मी माझे इंग्रजी चांगले केले. तेथून बिट्स पिलानीपर्यंतचा प्रवास झाला आणि त्यानंतरही मी पीएच. डी. न करता मित्रांच्या सहकार्याने थेट उद्योगात आलो. हा सारा प्रवासच अनेक अनुभव देणारा होता. मात्र त्याआधी मी पुण्यातल्या अंधशाळेच्या कामात आलो. सामाजिक कार्याचे अनुभव मला समृद्ध करणारे ठरले. उद्योगातही ते फायद्याचेच ठरले. संस्था असो की उद्योग, त्याच्या यशस्वितेसाठी आधी तुमचे 'स्टेकहोल्डर्स' कोण, हे आधी कळले पाहिजे. त्यांना केंद्रस्थानी ठेवून निर्णय झाले पाहिजेत. १९८१ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी मला एकदा बोलावले, तेव्हा तोट्यात जात असलेले काँग्रेसचे मुखपत्र 'विशाल सह्याद्री' चालवण्याचा आदेशच दिला. मी अवघ्या तीन महिन्यांत ते फायद्यात आणले. त्या अनुभवाचा मला 'सकाळ' चालवताना फायदा झाला. आपण एखादी संस्था, उद्योग ज्यांच्यासाठी चालवतो, त्याच्या उद्दिष्टाच्या केंद्रस्थानी त्याचे स्टेकहोल्डर्स हवेत. जसे की, वृत्तपत्र असेल तर वाचक आणि शाळा असेल तर विद्यार्थी.''

संचालक डॉ. दबडे यांनी अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेतला. लवकरच एआय अँड मशीन लर्निंग, रोबोटिक्स विभाग सुरू करण्याचा मनोदय व्यक्त केला. डॉ. मोमीन यांनी आभार मानले. प्रा. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी 'सकाळ' कोल्हापूर आवृत्तीचे संपादक निखिल पंडितराव उपस्थित होते. महाविद्यालयाच्या विविध विद्यार्थी विभागांमार्फत संयुक्तपणे संयोजन करण्यात आले.

## 'सकाळ' आणि 'वालचंद'

'सकाळ'ने वालचंद महाविद्यालयासाठी नेहमीच सहाय्याचा हात पुढे केला आहे,' अशा शब्दांत प्रा. संजय धायगुडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, ''२००५ मध्ये 'सकाळ'ने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रशिक्षण कामासाठी ७५ हजार रुपयांची मदत दिली. त्यानंतरही सातत्याने सहकार्य राहिले. २०१४ मध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांनी १ कोटींची देणगी दिली. त्या निधीच्या विनियोगासाठी महाविद्यालय स्तरावर समिती कार्यरत असून त्यातून विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून विविध उपक्रम राबवले जातात.''

## 'यिन'तर्फे वृक्षारोपण

'सकाळ'च्या 'यिन'तर्फे महाविद्यालयाच्या आवारात लोकमान्य टिळक सभागृहाशेजारी वृक्षारोपण झाले. या वेळी संचालक डॉ. दबडे यांच्यासह 'यिन'चे जिल्हा संघटक पृथ्वीराज चव्हाण, अमृत चव्हाण, वालचंद महाविद्यालयातील प्रतिनिधी उपस्थित होते.

## 'फायर इन माय हार्ट'

श्री. पवार यांनी व्याख्यानाच्या अखेरीस आपले मित्र, फिनोलेक्स कंपनीचे उद्योजक प्रल्हाद छाब्रिया यांची गोष्ट सांगितली. गर्भश्रीमंत छाब्रिया कुटुंब रस्त्यावर आले, तेव्हा पाच एकरांतील राजवाड्यात नोकरचाकरांसह राहणाऱ्या छाब्रिया यांना वडिलांच्या निधनानंतर दहाव्या वर्षी झोपडपट्टीत राहण्याइतपत वाईट वेळ आली. त्या माणसाने या संकटावर मात करीत उभारी घेत मृत्युसमयी दहा हजार कोटींचा उद्योगसमूह उभा केला. एकदा मी त्यांना, 'तुमच्या यशाचे सार एका वाक्यात कसे सांगाल,' असा सवाल केला. ते म्हणाले, ''आम्ही सारे गमावले होते; पण जिंकण्यासाठी आवश्यक असा 'देअर इज फायर इन माय हार्ट' माझ्याकडे होता.''



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात बुधवारी वालचंद-सकाळ व्याख्यानमालेत बोलताना 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार. समोर उपस्थित विद्यार्थी.

# भारतातील तंत्रकुशल मनुष्यबळाची जगाला गरज

## प्रतापराव पवार : 'सकाळ-वालचंद व्याख्यानमाले'त मुलांना 'उद्योजकतेचे धडे'

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. १४ : ''जगभरात जायची तयारी ठेवा. प्रगत देशांना भारतातील तंत्रकुशल मनुष्यबळाची गरज आहे,'' असे मत 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी व्यक्त केले. येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित 'वालचंद-सकाळ व्याख्यानमाले'त ते बोलत होते. 'बोल अनुभवाचे' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे, कार्पोरेट रिलेशन ॲल्युमिनाय अँड स्टुडंट करिअर विभागाचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, इनोव्हेशन, इंक्युब्युशन अँड अंत्रिप्रिनरशीप विभागाचे अधिष्ठाता डॉ. बशीरअहमद मोमीन व्यासपीठावर उपस्थित होते.

'सकाळ'ने महाविद्यालयास दिलेल्या एक कोटींच्या देणगीतून संशोधन-प्रशिक्षणासह विविध उपक्रम राबवले जातात. ही व्याख्यानमाला त्याचाच एक भाग आहे. गतवर्षी लेखक अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान झाले होते. आज सुमारे दीड तासांच्या संवादात श्री. पवार यांनी त्यांच्या जीवनामध्ये आलेल्या विविध अनुभवांचे कथन करीत मुलांना अनुभवसंपन्न केले.

पान ६ वर »

### उद्यमशीलतेचा कानमंत्र...

- कर्तव्य पार पाडताना सबबी सांगू नका
- सतत नवे शिकण्याचा, ज्ञान मिळविण्याचा ध्यास ठेवा
- २४ बाय ७ तास काम करण्याची तयारी ठेवा
- उत्पादनाचा ग्राहक कायम केंद्रस्थानी ठेवा
- आलेल्या संकटांना संधी समजून काम करा
- ज्या देशात जायचंय, तेथील भाषा आधीच शिका
- अनुकरण करू नका, स्वतःचे वेगळेपण जपा

### ढेकळवाडी ते पिलानी

श्री. पवार यांनी आपला जीवनप्रवास उलगडताना आई-वडील, भावंडांसह जडणघडणीच्या दिवसांबद्दल सांगितले. ते म्हणाले, ''काटेवाडीजवळच्या ढेकळवाडीतल्या मारुती मंदिरात भरणाऱ्या एकशिक्षकी शाळेतून आम्हा सर्व भावंडांच्या शिक्षणाची सुरुवात झाली. त्यामुळे इथे असलेल्या प्रत्येकाला त्यापेक्षा नक्की अधिक चांगली संधी आहे. 'पवार' आहोत, म्हणजे सारे सहजच मिळते, असा अनेकांचा समज असतो; मात्र ते आमच्या प्रयत्नांचे अवमूल्यन करणारे ठरते. आई-वडिलांनी जगण्याचे धडे शाळकरी वयात दिले. प्रसंगी शेती-सोने विकावे लागले तरी तुमच्या शिक्षणाला पैसा कमी पडणार नाही, असा त्यांचा निर्धार होता. काटेवाडी, बारामती, पुणे आणि बिट्स पिलानीपर्यंतचा शैक्षणिक प्रवास मी गुणवत्तेवर केला. मित्रांच्या सहाय्याने पहिला उद्योग सुरू केला. शिकल्यानंतर पुन्हा शेतीत यायचं नाही, असा आई-वडिलांचा तेव्हाच धडा होता.''

# गडकिल्ल्यांप्रमाणे मजबूत घरांची निर्मिती करावी

## सुनील पवार : सांगलीत 'क्रेडाई'तर्फे आयोजित 'ड्रीम होम एक्पो' वास्तू प्रदर्शनाची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांनी बांधलेले गड-किल्ले आजही साडेतीनशे वर्षांनंतर अस्तित्व टिकवून आहेत. आजही अनेक गडकिल्ले मजबूत आणि टिकाऊ आहेत. त्याचप्रमाणे बांधकाम व्यावसायिकांनी टिकाऊ आणि मजबूत घराची निर्मिती करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त सुनील पवार यांनी केले.

'क्रेडाई' सांगलीच्यावतीने नेमिनाथनगर येथे आयोजित ड्रीम होम वास्तू प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'क्रेडाई' महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष राजीव परीख होते. यावेळी क्रेडाई सांगलीचे अध्यक्ष जयराज सगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आयुक्त पवार म्हणाले, प्रत्येक कुटुंबासाठी त्यांचे घर महत्त्वाचे असते. बांधकाम व्यावसायिकांनी दर्जेदार आणि समाजात चांगली ओळख निर्माण करणारी घरे बांधावीत.

राजीव परिख म्हणाले, 'क्रेडाई' सांगलीने अतिशय नेटक्या पद्धतीने प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. सांगलीचे प्रदर्शन क्रेडाईच्या प्रत्येक जिल्हा कार्यकारिणीने पाहावे, असे आदर्शवत आहे.

जयराज सगरे यांनी स्वागत केले. क्रेडाईने सांगलीत कल्पद्रुम क्रीडांगण, नेमिनाथनगर आणि मिरजेत आहुजा लॉन येथे आयोजित केलेल्या ड्रीम होम प्रदर्शनास भरघोस प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले.

दरम्यान, ड्रीम होम प्रॉपर्टी एक्सपो प्रदर्शनात चार दिवसांत ४० कोटींची उलाढाल झाली. शेवटच्या दोन दिवसांत हजारो ग्राहकांनी प्रदर्शनास भेट दिली. चार दिवसांत ६० हजारांहून अधिक नागरिकांनी प्रदर्शनाला भेट दिली आहे. प्रदर्शनात स्पॉट बुकिंगमुळे ग्राहकांना तत्काळ खरेदी-विक्रीची सोय झाली. एकत्रित १५० पेक्षा जास्त स्टॉल सहभागी झाले होते.

व्यासपीठावर सचिव दिलीप पाटील, शैलेश पवार, उत्तम आरगे, निलेश अग्रवाल, सुरेश केरीपाळे, सौरभ कुलकर्णी, राजेश कुलकर्णी, राहुल घाडगे, प्रदीप पोतदार आदी उपस्थित होते. समन्वयक जयेश हरिया यांनी आभार मानले



सांगलीत सोमवारी क्रेडाईच्या ड्रीम एक्स्पो प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी आयुक्त सुनील पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी दिलीप पाटील, शैलेश पवार, उत्तम आरगे, निलेश अग्रवाल, सुरेश केरीपाळे, सौरभ कुलकर्णी, राजेश कुलकर्णी, राहुल घाडगे, प्रदीप पोतदार, जयेश हरिया उपस्थित होते

### वालचंद महाविद्यालयाशी सामंजस्य करार

समारोपाच्या कार्यक्रमात क्रेडाईने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाशी सामंजस्य करार केला. वालचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना बांधकामाचे ज्ञान मिळावे, यासाठी 'क्रेडाई' च्या प्रकल्पावर भेट द्यावी, प्रशिक्षण घ्यावे. तसेच क्रेडाईच्या तांत्रिक बाबींचा आणि 'वालचंद'च्या प्राध्यापकांच्या अनुभवाचा लाभ आमच्या सदस्यांना मिळावा, या उद्देशाने हा करार केल्याचे अध्यक्ष जयराज सगरे म्हणाले. आप्पासाहेब बिरनाळे आर्किटेक्ट महाविद्यालयाशीही असा करार करण्यात येणार आहे.

# वालचंद महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**जनप्रवास । सांगली**

येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा साजरा करण्यात आला. आठवडाभर रंगलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली. स्नेहसंमेलानाचे नेतृत्व श्रेयस पाटील, प्राधी बोबडे, हर्षवर्धन पाटील आणि तुषार पाटील तसेच एमटेकचे नेतृत्व शुभम कदम व डिप्लोमाचे नेतृत्व हर्षवर्धन वनमोरे व पार्थ चव्हाण यांनी केले.

सदर कार्यक्रमात प्रामुख्याने वालचंद ईव्ह, नाट्य स्पर्धा, नृत्य आणि गायन स्पर्धा, रॅम्प वॉक, पारंपरिक वेशभूषादिन आणि विविध क्रीडा स्पर्धा अशा अनेक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग दाखवला. दिनांक १६ फेब्रुवारी उद्‌घाटनप्रसंगी डॉ. सलील कुलकर्णी, सुप्रसिद्ध गायक यांची उपस्थिती लाभली. व्यासपीठावर डॉ. उदय दबडे (संचालक, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय), समन्वयक डॉ. अनिल सुर्वे (सहयोगी अधिष्ठाता विद्यार्थी उपक्रम विकास), ए. व्ही. कांबळे (उपसंचालक, पदविका विभाग) हे उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यानंतर नाटक व गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नाटक व गायन स्पर्धेचे आयोजन विद्यार्थी प्रतिनिधी श्री कृष्णा पारेख यांचा नेतृत्वात करण्यात आले.

दिनांक १७ रोजी सकाळी पारंपरिकदिन साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत उपस्थित विद्यार्थीगण यांच्या उत्साहाने महाविध्यालायाच्या परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ढीरवळींळेपरश्र लोाळींशश विद्यार्थी प्रतिनिधी अनमोल शेलार यांनी नेतृत्व सांभाळले. सायंकाळी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध नृत्य शैली प्रकारांचे उत्तम सादरीकरण या ठिकाणी अनुभवायला मिळाले. संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाच्या ओपन एअर थिएटर येथे आयोजित करण्यात आला. स्पर्धेचे आयोजन विद्यार्थी प्रतिनिधी दमयंती वाडकर यांचा नेतृत्वात करण्यात आले.

दिनांक १८ रोजी सकाळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी किरण कांबळे यांनी उत्तम कामगिरी निभावली. त्याच दिवशी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आला.

संपूर्ण स्नेहसंमेलन व वार्षिक क्रीडा स्पर्धा यात मिळालेल्या पारितोषिकाचे वाटप करण्यात आले. श्रीनिवास पाटील, अध्यक्ष माजी विद्यार्थी संघटना यांची उपस्थिती लाभली. संस्थेचे संचालक डॉ. उदय दबडे, डॉ. अनिल सुर्वे व पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम विद्यार्थी प्रतिनिधी जयेश गौड यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला.

# ‘वालचंद’च्या संमेलनात कलाविष्कार

## विविध कलागुणांच्या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांनी जिंकली मने

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा झाला. आठवडाभर रंगलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहसंमेलनाचे नेतृत्व श्रेयस पाटील, प्राधी बोबडे, हर्षवर्धन पाटील, तुषार पाटील तसेच एम.टेकचे नेतृत्व शुभम कदम, डिप्लोमाचे नेतृत्व हर्षवर्धन वनमोरे व पार्थ चव्हाण यांनी केले.

कार्यक्रमात प्रामुख्याने वालचंद ईव्ह, नाट्य स्पर्धा, नृत्य आणि गायन स्पर्धा, रॅम्प वॉक, पारंपरिक वेशभूषा आणि विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सोहळ्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध गायक डॉ. सलील कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे



वालचंदमध्ये स्नेहसंमेलनात दीपप्रज्वलन करताना मान्यवर. यावेळी संचालक डॉ. उदय दबडे, समन्वयक डॉ. अनिल सुर्वे, उपसंचालक ए. व्ही. कांबळे उपस्थित होते.

संचालक डॉ. उदय दबडे, समन्वयक डॉ. अनिल सुर्वे, उपसंचालक ए. वि. कांबळे उपस्थित होते. उद्घाटनानंतर नाटक व गायन स्पर्धेचे आयोजन केले होते. १७ फेब्रुवारी रोजी पारंपरिक दिन साजरा झाला. सायंकाळी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते. १८ रोजी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, उदय दबडे, डॉ. अनिल सुर्वे व पाहुण्यांनी पारितोषिक वितरण केले.

कार्यक्रमास प्रा. रेणुका खोत, प्रा. अक्षय भोसले, प्रा. एन. एन. कांबळे, प्रा. पी. ए. माने, प्रा. ए. ए. पवार, डॉ. एस. व्ही. गायकवाड, डॉ. बी. बी. व्हनखांडे, प्रा. एस. एस. कार्वेकर, प्रा. राहुल चीनमनवार, प्रा. ए. ए. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. सोहळ्यास व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, नामनिर्देशित सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.



**सांगली :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात दीप प्रज्वलनप्रसंगी सलील कुलकर्णी, डॉ. उदय दबडे, समन्वयक डॉ. अनिल सुर्वे, ए. वि. कांबळे.

# 'वालचंद'मध्ये स्नेहसंमेलनाचा जल्लोष

**सांगली, ता. २५ :** वालचंद ईव्ह, नाट्य, नृत्य, गायन, रॅम्पवॉक, पारंपरिक वेशभूषा, क्रीडा स्पर्धांनी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. गायक डॉ. सलील कुलकर्णी यांच्याहस्ते उद्घाटन झाले.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे, समन्वयक डॉ. अनिल सुर्वे, ए. वि. कांबळे उपस्थित होते. उद्घाटनानंतर नाटक, गायन स्पर्धा झाली. पारंपरिक दिनानिमित्त वेशभूषा स्पर्धा झाली. महाविद्यालयाच्या खुल्या मंचावर हे कार्यक्रम झाले. विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजनही केले होते. स्नेहसंमेलन आणि वार्षिक क्रीडा स्पर्धेतील गुणवंतांना पारितोषिक देण्यात आले. स्नेहसंमेलनपूर्व उपक्रमात वालचंद ईव्ह, वालचंद श्री, मिस्टर अँड मिस वालचंद हे कार्यक्रम घेण्यात आले.

स्नेहसंमेलनाचे नेतृत्व श्रेयस पाटील, प्राधी बोबडे, हर्षवर्धन पाटील आणि तुषार पाटील, शुभम कदम, हर्षवर्धन वनमोरे, पार्थ चव्हाण, पार्श्व पाटील, श्रेया पाटील या विद्यार्थ्यांनी केले. प्रा. रेणुका खोत, प्रा. अक्षय भोसले, प्रा. एन. एन. कांबळे, प्रा. पी. ए. माने, प्रा. ए. ए. पवार, डॉ. एस. व्ही. गायकवाड, डॉ. बी. बी. व्हनखांडे, प्रा. एस. एस. कार्वेकर उपस्थित होते.

# वालचंद महाविद्यालयास एनबीए व नॅकची मान्यता



वालचंद महाविद्यालय

सांगली, ता. ३ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून (एआयसीटीई) १९ ते २१ जानेवारी २०२४ च्या दरम्यान एनबीए (राष्ट्रीय मान्यता मंडळ) समितीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास तपासणीसाठी भेट दिली. तपासणीनंतरच्या अहवालानुसार महाविद्यालयाच्या स्थापत्य विभागाला (सिव्हील) सहा वर्षांसाठी, यांत्रिकी विभाग (मेकॅनिकल) आणि माहिती तंत्रज्ञान विभाग (आयटी) यांना तीन वर्षांसाठी एनबीएची मान्यता मिळाली. डिसेंबर २०२३ मध्ये महाविद्यालयास नॅकच्या (राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद) समितीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट देऊन निरीक्षणाअंती 'अ' मानांकन दिले आहे. वालंचद महाविद्यालयाची स्थापना सन १९४७ ला झाली आहे. एनबीए व नॅकच्या पूर्व तयारीसाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच ॲडमिनीस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद, नामनिर्देशित सदस्य अमोल चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे व सहयोगी अधिष्ठाता (गुणवत्ती हमी) डॉ. अनंत कोकणे मार्गदर्शन लाभले.

# वालचंद महाविद्यालयास एनबीए व नॅकची मान्यता

केसरी वृत्तसेवा

**सांगली:** सन १९४७ ला स्थापन झालेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाची वाटचाल श्री. अजित गुलाबचंद, चेअरमन, ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून १९ ते २१ जानेवारीच्या दरम्यान एनबीए (राष्ट्रीय मान्यता मंडळ) समितीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास तपासणीसाठी भेट दिली. तपासणीनंतरच्या अहवालानुसार महाविद्यालयाच्या स्थापत्यविभागाला (सिव्हील) सहा वर्षासाठी, यांत्रिकी विभाग (मेकॅनिकल) आणि माहिती तंत्रज्ञान विभाग (आयटी) यांना तीन वर्षासाठी एनबीएची मान्यता मिळाली. डिसेंबर २०२३ मध्ये महाविद्यालयास नॅक (राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद) च्या समितीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट देवून निरीक्षणाअंती मानांकन दिले आहे. एनबीए व नॅकच्या पूर्वतयारीसाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान लाभले. ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद, अमोल चव्हाण, महाविद्यालयाचे प्र.संचालक डॉ.उदय दबडे, डॉ. अनंत कोकणे यांचे मार्गदर्शन लाभले.

# ‘वालचंद अभियांत्रिकी’ ला एनबीए व नॅकची मान्यता

**सांगली :** १९४७ ला स्थापन झालेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाची वाटचाल अजित गुलाबचंद, चेअरमन, ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून दिनांक १९ ते २१ जानेवारी २०२४ च्या दरम्यान एनबीए (राष्ट्रीय मान्यता मंडळ) समितीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास तपासणीसाठी भेट दिली. तपासणीनंतरच्या अहवालानुसार महाविद्यालयाच्या स्थापत्य विभागाला सहा वर्षासाठी, यांत्रिकी विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभाग (आयटी) यांना तीन वर्षासाठी एनबीएची मान्यता मिळाली.

डिसेंबर २०२३मध्ये महाविद्यालयास नॅक समितीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट देवून निरीक्षणाअंती ‘अ’ मानांकन दिले आहे. एनबीए व नॅकच्या पूर्वतयारीसाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षकांचे योगदान लाभले. ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद, नामनिर्देशित सदस्य अमोल चव्हाण, प्र. संचालक डॉ. उदय दबडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनंत कोकणे यांचे मार्गदर्शन लाभले.

# पालिकेच्या जलशुद्धीकरणचा 'वालचंद'कडून अहवाल

## खा. संजय पाटील : क्षमतेत वाढ होणार

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

महानगरपालिकेच्या जल शुद्धीकरण केंद्रातील त्रुटी व उपाय योजना यासंदर्भातील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा अहवाल तयार झाला आहे. जुन्या शुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती व नवीन जलशुद्धीकरण केंद्राची क्षमतावाढ तातडीने होईल. पाणीपुरवठा सुरळीत होऊन स्वच्छ व शुद्ध पाणी नागरिकांना मिळेल, अशी माहिती खासदार संजय पाटील यांनी दिली.

महानगरपालिकेच्या माळबंगला येथील जलशुद्धीकरण प्रकल्पास खासदार पाटील यांनी भेट दिली होती. त्यावेळी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक सुनील पवार, संबंधित विभागाचे सर्व अधिकारी तसेच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे काही तज्ज्ञ यांच्यासोबत संपूर्ण जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर काही त्रुटी जाणवल्या होत्या.

रविवारी सांगली येथे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात बैठक झाली. खासदार संजय पाटील, आयुक्त सुनील पवार, पाणीपुरवठा विभागाचे विशेष कार्यकारी अधिकारी सुनील पाटील, कार्यकारी अभियंता चिदानंद कुरणे, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. व्ही. ए. दबडे, डॉ. जी. आर. मुनवल्ली, डॉ. ए. के. कोकणे, असिस्टंट प्रोफेसर बी. आर. कवठेकर आणि जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता ज्योती देवकर उपस्थित होते.

महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्राच्या पाहणीनंतर केलेल्या सूचनांप्रमाणे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या समितीने त्रुटी व उपाययोजनांचा अहवाल काल सादर केला. जुन्या ५६ एम एल डी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. नवीन ७० एम एल डी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र आहे. ते ५४ एम एल डी क्षमतेने चालवले जाते, ते पूर्ण क्षमतेने कार्यरत करणे, क्षमता वाढवणे या संदर्भात सूचना करण्यात आल्या. काही एजन्सी नेमण्याचे निश्चित झाले. येत्या काही दिवसांमध्ये लवकरात लवकर काम पूर्ण करण्यासाठी सूचना करण्यात आल्या. क्लोरिनेशन युनिट बसवण्यासंदर्भात सूचना करण्यात आल्या. प्रत्यक्ष पाहणी करून नमुने गोळा करून करून त्यांचे विश्लेषण करणे, सर्व माहितीचे विश्लेषण करून व्यवस्थापन करणे संबंधी समितीने अहवाल सादर केला आहे. त्याप्रमाणे सांगलीला शुद्ध आणि नियमित पाणी देण्यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती खासदार संजय पाटील यांनी दिली.



इस्लामपूर : येथे आरआयटीत आयोजित कार्यशाळेत सर्व प्राध्यापक.

# आरआयटीमध्ये 'ओरायन २ के २४'चे यशस्वी आयोजन

इस्लामपूर : पुढारी वृत्तसेवा

येथील आरआयटीमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनअंतर्गत आयोजित करण्यात आलेले राष्ट्रीय तंत्र संमेलन ओरायन २ के २४ नुकतेच पार पडले. आयईटीई स्टुडंट्स फोरम आणि आयएसटीई आरआयटी चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या समारंभास डॉ. पी. के. खरात, सिनेट सदस्य, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. खरात हे आर.आय.टी.चे २००१ आणि २००९ बॅचचे माजी विद्यार्थी आहेत. संचालक डॉ. पी. व्ही. कडोले यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रतिवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या संमेलनात यंदा सर्किट हंट, माईंड मेझ, डॉज बॉल, आयपीएल ऑक्शन, आरआयटीज गॉट टॅलेंट, रील क्राफ्ट असे विविध उपक्रम आयोजित केले होते. तांत्रिक स्पर्धा विशेष कौशल्ये आणि ज्ञानाला परिष्कृत करतात. अतांत्रिक स्पर्धा सर्जनशीलता, सहयोग आणि अनुकूलता विकसित करतात. प्रसारमाध्यमातून विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. संमेलनासाठी विविध महाविद्यालयातून ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रम समन्वयक प्रा. स्नेहल वाठारकर, विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस माळी, अनुष्का पाटील यांनी परिश्रम घेतले. सचिव प्रा. आर. डी. सावंत, संचालक डॉ. पी. व्ही. कडोले, डॉ. एल. एम. जुगुळकर, डॉ. ए. बी. काकडे आणि विभाग प्रमुख डॉ. एम. एस. पाटील आदी उपस्थित होते.




विज्ञान प्रदर्शनातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रा. सचिन चव्हाण, श्रीरंग पंडित व अश्पाक खान.

# विज्ञान प्रदर्शनामुळे भविष्यातील शास्त्रज्ञ निर्माण होतील : प्रा. चव्हाण

**भिलार : पुढारी वृत्तसेवा**

विज्ञान प्रदर्शनामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानात आवड निर्माण होऊन त्यामधूनच भविष्यातील शास्त्रज्ञ निर्माण होतील, असे प्रतिपादन वालचंद कॉलेज सांगलीचे प्रा. सचिन चव्हाण यांनी केले.

अकरावी व बारावी विज्ञानमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी सातारा येथे सर आईनस्टाईन अ‍ॅकॅडमीच्या वतीने आयोजित विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सर आईनस्टाईन अ‍ॅकॅडमीचे संचालक श्रीरंग पंडित, अश्पाक खान उपस्थित होते. प्रा. पंडित म्हणाले, विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन जागरूक व्हावा, या जाणिवेतून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र तसेच माहिती तंत्रज्ञान या विषयातील प्रकल्प याप्रसंगी सादर केले होते. या विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक दानिया शमशुद्दीन काझी आणि सेजल प्रवीण शिंदे, द्वितीय क्रमांक सोहम अनिल पवार आणि ओम अनंत शिंदे तर तृतीय क्रमांक श्रद्धा उमेश बाबर व अनुष्का जनार्दन सावंत, वेदांत संजय क्षीरसागर, किर्तीराज जितेंद्र कदम यांना विभागून देण्यात आला.

कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन सर आईनस्टाईन अ‍ॅकॅडमीचे संचालक श्रीरंग पंडित, अश्पाक खान तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.



**सांगली :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात 'चला जाणूया नदीला' कार्यशाळेत मार्गदर्शन करताना जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा.

# माणसांचे हृदय नद्यांशी जोडा : राणा

## सांगलीत ग्रामसेवक, नदीमित्र कार्यशाळा

■ **सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. २ : ''वाढत्या औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. नद्यांचे प्रदूषण वाढत चालले आहे. त्यामुळे माणसांचे हृदय, डोके, हात नद्यांशी जोडले तर नदीजोड प्रकल्प करण्याची गरंज भासणार नाही,'' असे मत जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी आज व्यक्त केले.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात जिल्हा परिषद, जल बिरादरी व वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला जाणूया नदीला' अभियानांतर्गत ग्रामसेवक व नदीमित्रांची कार्यशाळा आज पार पडली. यावेळी जलतज्ज्ञ डॉ. राणा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे उपस्थित होत्या.

जलतज्ज्ञ डॉ. राणा म्हणाले, ''औद्योगिकीकरण आणि पर्यावरणाचा ऱ्हास यामुळे नदी प्रदूषणाची समस्या गंभीर बनत आहे. त्यामुळे बदलत्या काळानुसार नद्यांचे प्रदूषण रोखण्याची गरज आहे. नदीला अमृतवाहिनी बनवल्याने खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जाईल. नीर, नारी आणि नदी अर्थात पाणी, महिला आणि नदीचा सन्मान करण्याची गरज आहे.''

मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या, ''चला, जाणूया नदीला अभियानाकडे केवळ शासकीय कार्यक्रम म्हणून न पाहता या विषयावर सर्वांनी संवेदनशीलपणे काम करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्थांकडे अनेक नावीन्यपूर्ण कल्पना असतात. त्यांच्यासोबत अशा विषयासाठी काम करणे आवश्यक आहे.''

जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक किरण सायमोते म्हणाले, ''स्वच्छ भारत अभियानांतर्गत सांडपाणी व्यवस्थापन करून नदीचे प्रदूषण होण्यापासून रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात.'' दरम्यान, याप्रसंगी जलतज्ज्ञ डॉ. राणा यांनी लिहिलेल्या 'सभ्यता की सुखती सरिता' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यशाळेत 'जलसंपदा'च्या कार्यकारी अभियंता ज्योती देवकर, डॉ. रवींद्र व्होरा, नरेंद्र चुघ, डॉ. उदयकुमार दबडे, विजय परांजपे, विनोद बोधनकर, सुमंत पांडे, सुनील राहणे यांच्यासह सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, निमंत्रित ग्रामसेवक उपस्थित होते.

# ‘वालचंद’चे चार विद्यार्थी ‘यूपीएससी’मध्ये चमकले

## फरहान जमादार, शारदा माद्यसवार, हर्षल घोगरे, अभिषेक ओझर्डे यांचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. १६ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या चौघांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवले. महाविद्यालयाच्या विविध विभागांत या विद्यार्थ्यांनी पदवी घेताना इथल्या शिदोरीवर ही धवल कामगिरी केली. यात फरहान जमादार (कोल्हापूर), शारदा माद्यसवार (चंद्रपूर), हर्षल घोगरे (इंदापूर) आणि अभिषेक ओझर्डे (वाई) यांचा त्यात समावेश आहे.

### ‘मेहनत अन् जिद्द वाया जाणार नाही’



**फरहान जमादार (ऑल इंडिया रँक १९१)**

‘तुम्ही मनापासून प्रयत्न केला असेल, तर अपयशाला घाबरू नका. मेहनत, जिद्द वाया जाणार नाही. स्वत:वर विश्वास ठेवाल, तर युद्धही लढू शकता. ‘यूपीएससी’ त्यापुढे काहीच नाही,’ असा सल्ला फरहान जमादार यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना दिला. फरहान यांचे बालपण कोल्हापूरच्या ताराबाई पार्कमध्ये गेले. महानगरपालिकेच्या शाळेत दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. वालचंद अभियांत्रिकीमध्ये कॉम्प्युटर सायन्सला प्रवेश घेतल्यानंतर यूपीएससीची तयारी सुरू केली. यूपीएससी तयारीसाठी ‘वालचंद’ने प्रोत्साहन दिले. नवजीवन पवार, हर्ष मंडलिक नीलेश कुंभार या माजी विद्यार्थ्यांनी येऊन मार्गदर्शन केले. कॉलेजमध्ये ७.५ स्कोअर होता. ‘ए फोर टेक्नॉलॉजी’ मध्ये नोकरीची संधी मिळाली. वडील प्रिंटिंग व्यवसायात आहेत. घरची परिस्थिती बेताची असताना सहा लाख रुपयांची नोकरी झुगारली. पहिल्या दोन प्रयत्नांत अपयश आले. तिसऱ्या वेळेस मुख्य परीक्षा दिली. चौथ्या वेळेत हा निकाल लागला. या काळात घरच्यांनी मानसिक आणि आर्थिक पाठबळ दिले. कोल्हापूरचे प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटर आणि ‘टीसीएस’ यांचा लाभ झाला. अपयश आले, तर पुन्हा या वाटेला यायचे नाही, असे ठरवून अभ्यास केला. या वेळी फॉर्म देखील भरला नाही. निकालानंतर मित्राचा फोन आला. घरच्यांसह आजी-आई आनंदून गेले.

### ‘काय करायचे ठरवा, दरवाजे उघडतीलच’



**शारदा माद्यसवार (ऑल इंडिया रँक २८५)**

‘एखादी गोष्ट काय करायची, कशी करायची, ते ठरवा. दरवाजा आपोआप उघडेल. सकारात्मक लोकांच्या संपर्कात राहा. मार्गदर्शक महत्त्वाचा असतो,’ अशी प्रतिक्रिया शारदा माद्यसवार यांनी दिली.

मूळच्या चंद्रपूरच्या असलेल्या शारदा यांचे शालेय शिक्षण चंद्रपुरात झाले. वडील ग्रामीण बँकेत व्यवस्थापक, तर आई गृहिणी आहे. बारावीनंतर ‘वालचंद’मध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगला प्रवेश घेतला. त्यानंतर यूपीएससीची तयारी सुरू केली. २०१९ ते कोरोना येईपर्यंत, त्यानंतर २०२२ पासून दिल्लीत तयारी केली. पहिल्या दोन वेळेस पूर्वपरीक्षेत अपयश आले. तिसऱ्या वेळेस मुख्य परीक्षा दिली. चौथ्या वेळेस निवड झाली. मी यूपीएससीतून अधिकारी व्हावे, असे वडिलांचे स्वप्न होते. निकाल कळाल्यानंतर बाबांनाच पहिला फोन केला. खात्री झाल्यानंतर ऑफिसमध्येच त्यांनी ‘माझी मुलगी पास झाली,’ म्हणत जल्लोष केला. अपयश आल्यानंतर आईने भावनिक आणि मानसिक बळ देण्याचा प्रयत्न केला. एका निकालाने माझे आयुष्य बदलून गेले आहे, अशी प्रतिक्रिया शारदा यांनी व्यक्त केली.

### ‘प्राथमिक स्तरापासूनच सांगलीशी जुळली नाळ’



**हर्षल घोगरे (ऑल इंडिया रँक ३०८)**

पुणे जिल्ह्यातील बावडा (ता. इंदापूर) येथील हर्षल यांनी २०१३ ते १७ या काळात ‘वालचंद’मध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. २०२० मध्ये यूपीएससी परीक्षेत ६१४ रँक मिळवली होती. त्यात समाधान न मानता त्यांनी पुन्हा तयारी सुरू केली. त्याच जोरावर आता ३०८ वी रँक मिळाली आहे. याद्वारे ‘आयपीएस’ मिळण्याची शक्यता आहे.

हर्षल म्हणाले, वडील ग्रामसेवक, तर आई गृहिणी आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेत त्यांनी हे यश मिळवले आहे. सांगलीशी त्यांची नाळ प्राथमिक स्तरापासूनच आहे. सांगलीत प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या जनरल एसपीपी थोरात निवासी शाळेत ते सातवी ते दहावीपर्यंत शिकण्यासाठी होते. त्यानंतर पदवीसाठी पुन्हा ‘वालचंद’मध्ये प्रवेश घेतला. त्याठिकाणी यूपीएससीसाठी जे वातावरण होते, त्याचा लाभ झाल्याचे हर्षल यांनी सांगितले.

> “महाविद्यालयाच्या गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, वालचंद महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे, सदस्य अमोल चव्हाण, चकोर गांधी यांनी या सर्व यशवंतांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या स्टुडंट करिअर विभागाकडून स्पर्धा परीक्षांकडे मुलांनी यावे, यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. त्यांच्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच स्पर्धा परीक्षेतील यशवंतांच्या मुलाखती आयोजित केल्या जातात. या मुलांच्या यशाने ‘वालचंद’च्या लौकिकात भर पडली आहे.’
>
> **- प्रा. संजय धायगुडे,**
> डीन, कार्पोरेट रिलेशन्स, ॲल्युमिनाय ॲन्ड स्टुडंट करिअर

### ‘आवडीच्या क्षेत्रात झोकून देऊन काम करा’



**अभिषेक ओझर्डे (ऑल इंडिया रँक ६६९)**

‘आपल्या आवडीच्या क्षेत्रात झोकून देऊन काम करा. प्रशासकीय नोकऱ्यांबाबत आज समाजाचा दृष्टिकोन नकारात्मक झाला आहे, तो बदलला पाहिजे. आपल्या परीने चांगले काम करण्याचा माझा प्रयत्न असेल,’ अशी प्रतिक्रिया अभिषेक ओझर्डे यांनी दिली. अभिषेक यांचे बारावीपर्यंत शिक्षण वाई (सातारा) येथे झाले. त्यानंतर सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांनी २०१२ ते १६ दरम्यान मेकॅनिकलची पदवी प्राप्त केली. त्यानंतर २०१६ ते १८ दरम्यान, बंगळूर ‘आयआयएम’मध्ये मॅनेजमेंटचे धडे गिरवले.

सध्या ते तेथेच सॅमसंग कंपनीत व्यवस्थापकीय पदावर कार्यरत आहेत. २०२२ पासून स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत. वडील ग्रामविकास अधिकारी, तर आई प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक आहेत.


माजी विद्यार्थी

# सुकृत ताम्हणकर यांना कोहिनूर गंधर्व पुरस्कार

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. २३ : पुण्यातील बालगंधर्व संगीत रसिक मंडळातर्फे येथील युवा गायक सुकृत ताम्हणकर यांना 'कोहिनूर गंधर्व' पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला. हा सोहळा पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार आहे. २५ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे स्वरूप आहे.

ताम्हणकर यांनी दहाव्या वर्षापासून शास्त्रीय संगीताचे शिक्षण दिवंगत अरविंद बुवा पटवर्धन यांच्याकडून घेतले. सध्या ते पं. हृषिकेश बोडस यांचे मार्गदर्शन घेत आहेत. स्वरराज छोटा गंधर्व प्रतिष्ठान निर्मित 'संगीत सौभद्र'मध्ये त्यांनी श्रीकृष्णाची भूमिका केली होती. पुणे, नाशिक, इंदोर, कोल्हापूर, सांगली



ताम्हणकर

याठिकाणी प्रयोग सादर करण्यात आले. 'संगीत मत्स्यगंधा'मध्ये त्यांनी पराशराची भूमिका केली होती. सुकृत यांना छोटागंधर्व गुण गौरव पुरस्कार या आधी प्रदान करण्यात आला आहे. सध्या ते बहुराष्ट्रीय कंपनीत वरिष्ठ अभियंता म्हणून काम करतात.

अभंगवाणी, गीतरामायण, नाट्यसंगीत आणि शास्त्रीय संगीताचे अनेक कार्यक्रम त्यांनी महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये केले आहेत. विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांचे ते चिरंजीव आहेत.

# 'वालचंद अभियांत्रिकी'त २९ रोजी कार्यक्रम

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात बुधवार, दि. २९ मे रोजी सकाळी १०.१५ वाजता शिक्षण संपवून उत्तीर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रांगणात केले आहे.

महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य आणि खासदार संजय पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष आणि प्रथितयश उद्योजक अजित गुलाबचंद हे याप्रसंगी मार्गदर्शन करतील. स्वायत्त पदवी अभ्यासक्रमाच्या चौदाव्या बॅचच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका प्रदान करण्यात येतील. २०२४ मध्ये पदवी आणि २०२३ मध्ये पदव्युत्तर उत्तीर्ण बॅचमधील गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके तसेच सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी आणि सर्वोत्कृष्ट खेळाडूंना सुवर्णपदके प्रदान केली जातील. स्पर्धा परीक्षेत प्रावीण्य मिळवलेल्या तसेच प्रथितयश कंपन्यांमध्ये नोकरी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांना देखील आमंत्रित करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांनी या समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी केले आहे.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात उद्या व्यावसायिक ध्येयारंभ दिन

सांगली, ता. २७ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करून शिवाजी विद्यापीठाची पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक आयुष्याचा ध्येयारंभ दिन (कमेन्समेंट डे) बुधवारी (ता. २९) आहे.

स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर महाविद्यालयाने पदवीधारकांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने प्रतिवर्षी मान्यवरांना निमंत्रित करून त्यांच्या हस्ते हा कार्यक्रम घेण्याची प्रथा सुरू केली. यंदा महाविद्यालयाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व खासदार संजय पाटील प्रमुख पाहुणे आहेत. परिषदेचे अध्यक्ष व उद्योजक अजित गुलाबचंद अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करतील.

कोविड-१९ मुळे गेल्या काही वर्षांत खंडित झालेली परंपरा पुन्हा सुरू होत आहे. स्वायत्त पदवी अभ्यासक्रमाच्या चौदाव्या बॅचच्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांमध्ये गुणपत्रिका प्रदान करण्यात येतील. २०२४ मध्ये पदवी आणि २०२३ मध्ये पदव्युत्तर उत्तीर्ण बॅचमधील गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके, तसेच सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी आणि सर्वोत्कृष्ट खेळाडूस सुवर्णपदके प्रदान केली जातील. या कार्यक्रमात जीएटीई, जीआरई, सीएटी, तसेच यूपीएससी, एमपीएससी या स्पर्धा परीक्षेत प्रावीण्य मिळवलेल्या, प्रथितयश कंपन्यांमध्ये नोकरी संपादन केलेल्यांचा सत्कारही होणार आहे. या कार्यक्रमांसाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी केले आहे.

# आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांत सक्षमता हवी

## 'वालचंद'मध्ये 'कमिन्समेंट डे' उत्साहात साजरा

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : जगासमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षम असणे आवश्यक आहे, असे मत वालचंद कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी व्यक्त केले.

औपचारिक अभियांत्रिकी शिक्षणाची यशस्वीपणे सांगता करून आपल्या व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा Commencement Day वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत उत्साही वातावरणात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वालचंद कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सांगलीचे खासदार आणि महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य संजयकाका पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या गेल्या वर्षभरातील प्रगतीचा धावता




वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात कमिन्समेंट डे कार्यक्रमात बोलताना अजित गुलाबचंद व इतर

आढावा घेतला व येत्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयामध्ये Robotics and -utomation आणि -rtificial Intelligence and Machine Learning हे दोन ६० प्रति क्षमतेचे पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात तसेच Computer Science and Engineering मध्ये ९० आणि Information Technology मध्ये ६० अशी प्रवेश क्षमता वाढण्यास विनाअनुदान तत्त्वावर -ICTE कडून मंजुरी मिळण्याची घोषणा केली व Construction Management हा १२ प्रती प्रवेश क्षमतेचा पदव्युत्तर अभ्यासक्रम देखील नव्याने सुरू होत असल्याचे सांगितले.

प्रथितयश उद्योजक आणि महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी सर्वप्रथम Commencement Day या संकल्पनेचे पाश्चात जगामध्ये पूर्वीपासून प्रचलित असलेल्या परंपरेचे महत्व विषद केले. महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतरचे जग हे विद्यार्थ्यांच्या कल्पनेतील विश्वासारखे सहज नसून प्रचंड आव्हानात्मक आहे. याची जाणीव करून देतानाच त्या आव्हानांचा मुकाबला यशस्वीपणे करण्यासाठी स्वतःला सक्षम बनवणे आवश्यक असल्याच्या गरजेवर भर दिला.

महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक डॉ. बी एन नाईक यांनी उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक सचोटी जपण्याची प्रतिज्ञा दिली. यानंतर सर्व शाखा मधील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके देऊन गौरवण्यात आले तसेच G-TE, GRE मध्ये यश प्राप्त केलेल्या आणि स्वतःला सिद्ध करून प्रचंड स्पर्धेतून प्रथितयश कंपन्यांमध्ये नोकरी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना देखील गौरवण्यात आले. महाविद्यालयाच्या २०१९ च्या बॅचची स्थापत्य अभियांत्रिकीची विद्यार्थिनी आदिती चौगुले ने २०२३ मध्ये यूपीएससी परीक्षेत IRS साठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला.

यानंतर २०२४ च्या बॅचमधील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी आणि सर्वोत्कृष्ट खेळाडू यांची निवड प्रक्रिया प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी विशद केली. कु. गौरी धनंजय मोहिते हिची सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थिनी म्हणून तर विनीत विकास पाटील ह्याचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड जाहीर केली व त्यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनंत कोकणे यांनी आभार मानले. डॉ. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, डॉ. मोहन वनरोट्टी, श्रीनिवास पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य माजी महापौर सुरेश पाटील, चिदंबर कोटीभास्कर, मुकुल परीख, दीपकबाबा शिंदे, महाविद्यालयाच्या शैक्षणिक सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रा. एन.सी. शिवप्रकाश, उद्योजिका प्रभाताई कुलकर्णी, वास्तुविशारद प्रमोद चौगुले हे उपस्थित होते.

# वालचंदच्या अभियंत्यांनी विविध क्षेत्रे व्यापावी

## अजित गुलाबचंद : महाविद्यालयात 'कॉमेन्समेंट डे'निमित्त यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** संपूर्ण जग हे आता या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्षेत्र असून व्यावसायिक जगाची विविध क्षेत्रे वालचंदीय अभियंत्यांनी व्यापून टाकावीत, असे आवाहन उद्योजक तथा वालचंद महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी येथे केले.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा 'कॉमेन्समेंट डे' झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कौन्सिलचे सदस्य, खासदार संजय पाटील हे प्रमुख पाहुणे होते. अजित गुलाबचंद यांनी 'कॉमेन्समेंट डे' या अमेरिकेमध्ये पूर्वीपासून प्रचलित असलेल्या परंपरेचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतरचे जग विद्यार्थ्यांच्या कल्पनेतील विश्वासारखे सहजसोपे नसून प्रचंड आव्हानात्मक आहे. त्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी स्वतःला सक्षम बनवत धैर्यपूर्वक कृतीतून त्यावर मात करणे आवश्यक आहे. व्यावसायिक क्षेत्रात अजाणतेपणे चुका होणे हे क्षम्य असले, तरी कोणालाही जाणीवपूर्वक हानी पोहोचणार नाही, हे व्यावसायिक मूल्य अंगीकारणे आवश्यक आहे. विस्तारित जगात यशस्वी होण्यासाठी टीमवर्क आवश्यक आहे. परस्पर विश्वास हाच टीमवर्कचा पाया आहे.

खासदार पाटील म्हणाले, वालचंद महाविद्यालयाची अनेक वर्षांची गौरवपूर्ण परंपरा आहे. लोकप्रतिनिधी म्हणून कोणत्याही बाबतीत या महाविद्यालयाच्या पाठीशी उभे राहू.

प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी प्रास्ताविकात प्रगतीचा आढावा घेतला. चालू शैक्षणिक वर्षापासून 'रोबोटिक्स अँड ॲटोमेशन', 'आर्टिफिशियल इन्टेलिजन्स अँड मशिन लर्निंग', 'कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग', 'आयटी' या अभ्यासक्रमास विनाअनुदान तत्त्वावर 'एआयसीटीई'ची मंजुरी मिळाल्याची घोषणा केली. कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट हा पदव्युत्तर अभ्यासक्रमही नव्याने सुरू होत असल्याचे सांगितले.

परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एन. नाईक यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना व्यावसायिक सचोटी जपण्याची प्रतिज्ञा दिली. विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, डॉ. मोहन वनरोट्टी, विकास समितीचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, सुरेश पाटील, चिदंबर कोटीभास्कर, अर्थ समिती सदस्य दीपक शिंदे, सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रा. एन. सी. शिवप्रकाश, उद्योजिका प्रभा कुलकर्णी, वास्तुविशारद प्रमोद चौगुले, राकेश मिरजे उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ. अनंत कोकणे यांनी आभार मानले. डॉ. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले.



वालचंद अभियांत्रिकीतील यशस्वी विद्यार्थ्यांना अजित गुलाबचंद, खासदार संजय पाटील यांच्या हस्ते पदक देऊन गौरवले. (छाया : नंदकिशोर वाघमारे)

### आयपीएस आदिती चौगुले हिचा सन्मान

२६ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके दिली. प्रथितयश कंपन्यांत नोकरी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना गौरवले. आदिती चौगुले हिची 'आयपीएस'साठी निवड झाल्याबद्दल सत्कार केला. गौरी मोहिते आणि विनीत पाटील यांचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरव केला.

# सांगली वालचंदचे टेक्निकल विद्यापीठात रूपांतराचे स्वप्न

## अजित गुलाबचंद : तीन वर्षांत विद्यापीठ नावारूपास येईल

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : देशभर नावलौकिक असलेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे टेक्निकल विद्यापीठात रूपांतर करण्याचे स्वप्न आहे. विद्यापीठ होण्याच्या मार्गात काही अडथळे आहेत, ते दूर झाले की येत्या तीन वर्षांत विद्यापीठ नावारूपास येईल, असा विश्वास वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी येथे पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

ते म्हणाले, आज जगभरात अनेक कंपन्या तंत्रज्ञान पुरवतात. परदेशी विद्यापीठातील ज्ञान घेऊन आपले ज्ञान वाढवले पाहिजे. त्यांच्याकडील तंत्रज्ञान आत्मसात करून येथील विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे.




अभियांत्रिकी क्षेत्रात या शतकात काय आवश्यक आहे, ते केले पाहिजे. हा दृष्टिकोन ठेवून वालचंद अभियांत्रिकीची वाटचाल सुरू आहे. यंदाच्या वर्षात कॉम्प्युटर सायन्स, आय.टी., ए.आय. मशिन्स लर्निंग, रोबोटिक्स असे नवे अभ्यासक्रम सुरू करीत आहोत. हे नवीन कोर्सेस विनाअनुदानित असून त्याच्या एकूण

### त्यांना शिक्षणात रस नाही

अजित गुलाबचंद यांनी विद्यापीठ स्थापनेत अडथळे येत असल्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, काहींनी अडचणी निर्माण केल्या आहेत. त्यांना शिक्षणात रस नाही. त्यांनी चांगल्या कामात अडथळे आणू नयेत.

२८२ जागा असतील. गव्हर्न्मेंटच्या सध्याच्या ३९० अधिक ३६ जागा या कायम राहतीलच.

ते पुढे म्हणाले, येत्या काही वर्षांत वालचंद महाविद्यालयाचे विद्यापीठात रूपांतर करण्याचे आमचे स्वप्न आहे. टेक्निकल विद्यापीठात रूपांतर करण्यासाठी ज्या काही गोष्टी आवश्यक असतील त्याची तयारी सुरू आहे. विद्यापीठ होण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणी अडथळे आणू नयेत अशी आमची अपेक्षा आहे. जॉर्जिया टेक, निकमार या विद्यापीठांच्या धर्तीवर वालचंदची विद्यापीठ म्हणून नवी ओळख करण्याचा आमचा प्रयत्न राहील. येत्या तीन वर्षांत त्याला यश मिळेल. या वेळी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, फायनान्स कमिटी सदस्य दीपक शिंदे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे, चिदंबर कोटीभास्कर, प्रमोद चौगुले, मुकुल परीख, कार्पोरेट रिलेशन आणि विद्यार्थी कल्याणचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, अविनाश पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

# वालचंद टेक्निकल युनिव्हर्सिटी उभारण्याचे स्वप्न

## अजित गुलाबचंद : न्यायालय निर्णयाने मार्ग मोकळा, आता अथडळे नकोत

सांगली : पुढारी वृत्तसेवा

अमेरिकेतील जॉर्जिया टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर सांगलीत वालचंद टेक्निकल युनिव्हर्सिटी उभारण्याचे स्वप्न आहे. तीन वर्षांत ते पूर्ण होईल. उच्च न्यायालयाच्या निर्णयाने वालचंदच्या उच्च शैक्षणिक विकासातील अडथळा दूर झाला आहे. अडथळा आणणाऱ्यांनी आता तो आणू नये, असे वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य खासदार संजय पाटील, कौन्सिल सदस्य चकोर गांधी, कॉलेजच्या आर्थिक समितीचे संचालक दीपक शिंदे, प्रभारी संचालक प्रो. डॉ. उदय दबडे, अमोल चव्हाण, वालचंद कॉलेज कार्पोरेट रिलेशनचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे तसेच आर्किटेक्ट प्रमोद चौगुले, अभियंता श्रीनिवास पाटील, बजरंग पाटील उपस्थित होते.

### एआय, रोबोटिक्स, कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट..!

**अजित गुलाबचंद म्हणाले, वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सध्या कॉम्प्युटर सायन्स, आयटी, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्टॉनिक्स या विद्या शाखांची प्रवेश क्षमता ४२६ आहे. याव्यतिरिक्त विनाअनुदान तत्त्वावर काही नवीन अभ्यासक्रम सुरू करत आहोत. अस्तित्वातील काही अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता वाढवत आहोत. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशिन लर्निंग (प्रवेश क्षमता ६०), रोबोटिक्स अँड ऑटोमेशन (प्रवेश क्षमता ६०) तसेच वर्किंग प्रोफेशनल प्रवेश क्षमता (९०), कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट (प्रवेश क्षमता १२) या पदव्युत्तर अभ्यासक्रमचाही समावेश आहे. कॉम्प्युटर सायन्ससाठी ९० आणि आयटीची ६० प्रवेश क्षमता वाढवत आहोत.**

गुलाबचंद म्हणाले, वालचंद कॉलेजबाबत शिक्षणाविषयी कसलाही इंटरेस्ट नसलेल्या व्यक्तींनी अडथळा आणला. आता आणू नये. उच्च न्यायालयाच्या निकालाने आशा निर्माण झाली आहे. देश सुपर पॉवर बनू इच्छितो. त्यासाठी आपल्या तरुण, तरुणींमध्ये ती क्षमता आणली पाहिजे. त्यासाठी जगातील अत्याधुनिक शिक्षण येथे उपलब्ध असले पाहिजे. कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट, फॅसिलिटी मॅनेजमेंट, स्कूल ऑफ आर्किटेक्चर, अर्बन डेव्हलपमेंट, अर्बन मॅनेजमेंट यावरही फोकस ठेवला पाहिजे. आपल्याकडे हायवे होतात. टोलनाक्याचे मॅनेजमेंट होते. पण, या रस्त्यांच्या नियमित देखभालीविषयी पुरेसे गांभीर्य नाही. परदेशात रस्त्यांच्या नियमित देखभालीसाठी वेगळ्या कंपन्या आहेत. एकूणच इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट महत्वाचे आहे. आधुनिक शिक्षणाच्या ज्या क्षेत्रात आपण मागे आहोत, त्या क्षेत्रात पुढे असणाऱ्या परदेशातील विद्यापीठांशी संपर्क साधला पाहिजे. त्यांचे ज्ञान घेवून आपले ज्ञान वाढवले पाहिजे. आधुनिक जगाचे इंजिनिअर तयार करायचे आहेत, असा विश्वास गुलाबचंद यांनी व्यक्त केला.

गुलाबचंद म्हणाले, एआय (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स)बाबत जेवढा बाऊ झाला आहे, तेवढे अजून प्रत्यक्षात आलेले नाही. खरे 'एआय' यायला अजून वेळ आहे. आपल्या शिक्षण व्यवस्थेत त्याचा अंगिकार केला पाहिजे; अन्यथा विद्यार्थी परदेशात शिकायला जातील. त्यामुळेच वालचंद टेक्निकल युनिव्हर्सिटी महत्वाची असणार आहे. वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून काही नवीन अभ्यासक्रम सुरू होणार आहे. ते शासन अनुदानाशिवाय असतील. काही व्यवसायांची सामाजिक गरज असते. ती पूर्ण करणे हा उद्देश आहे. सुपरपॉवर होण्याची क्षमता आपल्याकडे आली पाहिजे. त्यासाठी काही संस्था उभाराव्या लागतील. असलेल्या संस्थांमध्ये सुधारणा करावी लागेल.

# विविध क्षेत्रे वालचंदच्या अभियंत्यांनी व्यापावीत

## अजित गुलाबचंद : वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजचा 'कमेन्समेंट डे' उत्साहात

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमधून अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी आता संपूर्ण जग हे कार्यक्षेत्र आहे. व्यावसायिक जगाची विविध क्षेत्रे वालचंदच्या या अभियंत्यांनी व्यापावीत, असे उद्गार वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी काढले.

वालचंद इंजिनिअरिंग कॉलेमध्ये बुधवारी 'कमेन्समेंट डे' अर्थात बी. टेक, एम. टेक. अभ्यासक्रम पूर्ण करून शिवाजी विद्यापीठाची पदवी प्राप्त करणार्‍या विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक आयुष्याचा 'प्रारंभ दिन' उत्साहात झाला. अजित गुलाबचंद प्रमुख उपस्थित होते. कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व खासदार संजय पाटील हे प्रमुख पाहुणे होते.

गुलाबचंद म्हणाले, व्यावसायिक क्षेत्रात अजाणतेपणे चुका होणे हे क्षम्य असले तरी, मी कोणालाही जाणीवपूर्वक हानी पोहोचणार नाही हे व्यावसायिक मूल्य अंगी बाणवणे अत्यंत आवश्यक आहे. विस्तारलेल्या जगामध्ये यशस्वी होण्यासाठी टीमवर्क आवश्यक आहे. परस्पर विश्वास हाच टीमवर्कचा पाया आहे. व्यावसायिक जगाची विविध क्षेत्रे वालचंदच्या अभियंत्यानी व्यापावीत. खासदार पाटील म्हणाले, इंजिनिअरिंग क्षेत्रात कॉलेजची परंपरा गौरवपूर्ण आहे. लोकप्रतिनिधी म्हणून कोणत्याही बाबतीत या कॉलेजच्या पाठीशी उभा राहीन. परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एन. नाईक यांनी उत्तीर्ण होऊन बाहेर पडणार्‍या विद्यार्थ्यांना व्यवसायिक सचोटी जपण्याची प्रतिज्ञा दिली. सर्व शाखा मधील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके देऊन गौरवण्यात आले. गेट, जीआरई मध्ये यश प्राप्त केलेल्या आणि स्वतःला सिद्ध करून प्रचंड स्पर्धेतून नामवंत कंपन्यांमध्ये नोकरी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. माजी विद्यार्थीनी आदिती चौगुले यांनी २०२३ मध्ये यूपीएससी परीक्षेत यश मिळवत 'आयआरएस'साठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. यानंतर २०२४ च्या बॅचमधील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी गौरी धनंजय मोहिते हिची, तर सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून विनीत विकास पाटील याची निवड जाहीर केली. त्यांचा सन्मान केला. कॉलेजपचे प्रभारी संचालक प्रो. डॉ. उदय दबडे यांनी यांनी प्रास्ताविक केले. येत्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयामध्ये रोबोटिक्स ॲण्ड ऑटोमेशन आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ॲण्ड मशिन लर्निंग हे दोन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट हा पदव्युत्तर अभ्यासक्रमही नव्याने सुरू होत आहे, असे त्यांनी सांगितले. आभार अधिष्ठता (शैक्षणिक) डॉ. अनंत कोकणे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. नारायण आपटे यांनी केले.

कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, डॉ. मोहन वनरोट्टीर, आर्थिक समितीचे सदस्य दीपक शिंदे, अधिष्ठाता (कार्पोरेट रिलेशन) प्रा. संजय धायगुडे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, सुरेश पाटील, चिदंबर कोटीभास्कर, शैक्षणिक सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रा. एन.सी. शिवप्रकाश तसेच प्रभाताई कुलकर्णी, प्रमोद चौगुले, राकेश मिरजे उपस्थित होते.




**सांगली : वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या 'कमेन्समेंट डे' मध्ये मार्गदर्शन करताना कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद. यावेळी खासदार संजय पाटील, प्रभारी डॉ. उदय दबडे आदी.**
(छाया : सचिन सुतार)

# वालचंदचे टेक्निकल विद्यापीठात रुपांतर करणार

## अजित गुलाबचंद : यंदा पाच नव्या अभ्यासक्रमास प्रारंभ

**सांगली / प्रतिनिधी**

येत्या काही वर्षात वालचंद महाविद्यालयाचे विद्यापीठात रूपांतर करण्याचे आमचे ध्येय आहे. टेक्निकल विद्यापीठात रूपांतर करण्यासाठी ज्या काही गोष्टी आवश्यक असतील त्याची तयारी सुरू केली आहे. विद्यापीठ होण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणी अडथळे आणू नयेत अशी आमची अपेक्षा असल्याचे मत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी पत्रकार बैठकीत बोलताना व्यक्त केले.

अजित गुलाबचंद म्हणाले, देशभर नावलौकीक असलेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे टेक्निकल विद्यापीठात रूपांतर करण्याचे स्वप्न आहे. विद्यापीठ होण्याच्या मार्गात काही अडथळे आहेत, ते दूर झाले की येत्या तीन वर्षात विद्यापीठ नावारूपास येईल. जगभरात अनेक कंपन्या तंत्रज्ञान पुरवतात. त्यांच्याकडील तंत्रज्ञान आत्मसात करून येथील विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे.

अभियांत्रिकी क्षेत्रात या शतकात काय आवश्यक आहे, ते केले पाहिजे. हा दृष्टीकोन ठेवून वालचंद अभियांत्रिकीची वाटचाल सुरू आहे. यंदाच्या वर्षात कॉम्प्युटर सायन्स, आय. टी., ए. आय. मशिन्स लर्निंग, रोबोटिक्स असे नवे अभ्यासक्रम सुरू करीत आहोत. जॉर्जिया टेक, निकमार या विद्यापीठांच्या धर्तीवर वालचंदची विद्यापीठ म्हणून नवी ओळख करण्याचा आमचा प्रयत्न राहील. येत्या तीन वर्षात त्याला यश मिळेल.

यावेळी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, फायनान्स कमिटी सदस्य दीपक शिंदे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे, चिदंबर कोटीभास्कर, प्रमोद चौगुले, मुकुल परीख, कार्पोरेट रिलेशन आणि विद्यार्थी कल्याणचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, अविनाश पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

# 'वालचंद' आता 'विद्यापीठ' होणार

## चेअरमन अजित गुलाबचंद : पुढील वाटचाल महाविद्यालयाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. २९ : ''अभियांत्रिकी क्षेत्रात 'वालचंद'चा दबदबा आहे. आता यापुढची वाटचाल महाविद्यालयाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी असेल. त्यासाठी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे रुपांतर 'वालचंद तंत्रज्ञान विद्यापीठ' करण्याचा मानस आहे. येत्या तीन वर्षांत याबाबत गतीने काम होईल,'' अशी माहिती ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद यांनी दिली. महाविद्यालयातील आरंभ दिनाच्या कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

अजित गुलाबचंद म्हणाले, ''महाविद्यालयाच्या प्रगतीचा पुढचा टप्पा 'वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' असे तंत्रज्ञान विद्यापीठ करण्याचा आहे. ही संस्था केवळ 'आयआयटी'सारखी नाही तर, त्याहीपुढे जायचे आहे. ज्यापद्धीतने 'निकमार' युनिव्हर्सिटीचे काम होते, त्या दर्जाचे शिक्षण देण्याचे काम यापुढच्या काळात वालचंदमध्ये होईल. उदाहरण सांगायचे झाल्यास परदेशात रस्ते देखभाल-दुरुस्तीसाठी कंपन्या आहेत. त्याप्रकारच्या कंपन्या भारतात नाहीत आणि मनुष्यबळही नाही. ते निर्माण करण्याचे काम विद्यापीठांचे आहे. त्याचाच भाग म्हणून यापुढच्या काळात परदेशी विद्यापीठांशी करार करून ज्ञानाचे आदान-प्रदान केले जाईल.''

''संस्थेचा विस्तार करण्यासाठी काही नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. यात 'यूजी'चे रोबोटिक ऑटोमेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजेन्स अँड मशीन लर्निंग हे प्रत्येकी ६० प्रवेश क्षमतेचे दोन अभ्यासक्रम



अजित गुलाबचंद

विनाअनुदानित तत्त्वावर सुरू करण्यात आले आहेत. 'पीजी'साठी कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून त्यासाठीची प्रवेश क्षमता १२ इतकी आहे. तसेच इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या ६०, तर कॉम्प्युटर सायन्सच्या ९० जागा वाढवण्यात आल्या आहेत.

त्यामुळे यूजीची प्रवेश क्षमता ४२६ वरून ६९६ वर पोहोचली आहे. पीजीची क्षमता १५० वरून १६२ वर पोहोचली आहे. वर्किंग प्रोफेशनलच्या ९० जागा आहेत, असे संचालक डॉ. उदय दबडे यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, दीपक शिंदे, माजी विद्यार्थी संघटनेचे श्रीनिवास पाटील, संचालक डॉ. उदय दबडे, चिदंबर कोटीभास्कर, आर्किटेक्चर प्रमोद चौगुले, मुकुल पारीख, कार्पोरेट रिलेशन्सचे अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे यांची उपस्थिती होती.

### 'आता अडचणी आणू नयेत'

**■ संस्थेपुढे मागच्या काळात काहींनी अडचणी निर्माण केल्या होत्या. मुलांच्या शिक्षणाचे त्यांना काही पडले नव्हते. उच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा संस्थेच्या प्रगतीचे दरवाजे उघडले आहेत. ज्यांनी पूर्वी अडथळे आणले, त्यांनी यापुढे आणू नयेत, असे आवाहन अजित गुलाबचंद यांनी केले.**

# वालचंद होणार तंत्रज्ञान 'विद्यापीठ' : अजित गुलाबचंद

## दर्जेदार शिक्षण देणार : नवे अभ्यासक्रम सुरु करणार



**सांगली : वॉलचंद अभियांत्रिकी महाविद्यालयच्या कार्यक्रमात विद्यार्थी व मान्यवरांना मार्गदशन करताना अजित गुलाबचंद.**

**प्रतिनिधी**
सांगली

अभियांत्रिकी क्षेत्रात 'वालचंद' अभियांत्रिकी महाविद्यालयाचा दबदबा आहे. 'महाविद्यालयाच्या प्रगतीचा पुढचा टप्पा 'वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' असे तंत्रज्ञान विद्यापीठ करण्याचा आहे. येत्या तीन वर्षांत याबाबत गतीने काम होईल, अशी माहिती ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद यांनी दिली. महाविद्यालयातील आरंभ दिनाच्या कार्यक्रमानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

अजित गुलाबचंद म्हणाले, वालचंद ही संस्था केवळ 'आयआयटी'सारखी नाही तर, त्याहीपुढे जायचे आहे. ज्यापद्धीतने 'निकमार' युनिव्हर्सिटीचे काम होते, त्या दर्जाचे शिक्षण देण्याचे काम यापुढच्या काळात वालचंदमध्ये होईल. परदेशात रस्ते देखभाल दुरुस्तीसाठी कंपन्या आहेत. त्याप्रकारच्या कंपन्या भारतात नाहीत आणि मनुष्यबळही नाही. ते निर्माण करण्याचे काम विद्यापीठांचे आहे. त्याचाच भाग म्हणून यापुढच्या काळात परदेशी विद्यापीठांशी करार करून ज्ञानाचे आदान-प्रदान केले जाईल.

'संस्थेचा विस्तार करण्यासाठी काही नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. यात 'यूजी'चे रोबोटिक ऑटोमेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजेन्स ॲण्ड मशीन लर्निंग हे दोन अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यात आले आहेत. 'पीजी'साठी कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. तसेच इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या ६० तर, कॉम्प्युटर सायन्सच्या ९० जागा वाढवण्यात आल्या आहेत. यामुळे युजीची प्रवेश क्षमता ४२६ वरुन ६९६ वर पोचली आहे. तर पीजीची क्षमता १५० वरून १६२ वर पोचली आहे. वर्किंग प्रोफेशनलच्या ९० जागा आहेत. असे संचालक डॉ. उदय दबडे यांनी सांगितले.

ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, दीपक शिंदे, माजी विद्यार्थी संघटनेचे श्रीनिवास पाटील, संचालक डॉ. उदय दबडे, चिदंबरम कोटीभास्कर, आर्किटेक्चर प्रमोद चौगुले, मुकुल पारीख, प्रो. संजय धायगुडे यांची उपस्थिती होती.

### आता अडचणी आणू नयेत

संस्थेपुढे मागच्या काळात काहींनी अडचणी निर्माण केल्या होत्या. मुलांच्या शिक्षणाचे त्यांना काही पडले नव्हते. उच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा संस्थेच्या प्रगतीची दरवाजे उघडले आहेत. ज्यांनी पूर्वी अडथळे आणले, त्यांनी यापुढे आणू नयेत, असे आवाहन अजित गुलाबचंद यांनी केले.

# वालचंद अभियांत्रिकीला अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान

## ▮ पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे बोधचिन्ह

**जनप्रवास । सांगली**

संपूर्ण गात नावलौकिक असलेल्या येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडून अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा असा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

त्यामुळे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली अशा दोघांतर्फे संयुक्त पदवी प्रदान केली जाईल आणि विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाच्या बोधचिन्हासोबत महाविद्यालयाचे देखील बोधचिन्ह असेल. हा एक मोठा टप्पा असून विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्याच्या मार्गातील एक महत्त्वाचा टप्पा असून महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष श्री. अजित गुलाबचंद आणि सदस्य श्री. अमोल चव्हाण ह्यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंद तंत्रशास्त्र विद्यापीठाचे स्वप्न लवकरच साकार होईल असा विश्वास महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. (डॉ.) उदय दबडे यांनी व्यक्त केला.



विद्यापीठ कोल्हापूर डावीकडून डॉ. पी. एस. पाटील, श्री. सचिन मेनन, प्रा. डॉ. यु. ए. दबडे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव व्ही. एन. शिंदे.



सांगली : अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करताना डॉ. पी. एस. पाटील, सचिन मेनन, डॉ. यु. ए. दबडे.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला अधिकार प्रदत्त

## स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडून अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. यामुळे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली अशा दोघांतर्फे संयुक्त पदवी प्रदान केली जाईल आणि विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाच्या बोधचिन्हासोबत महाविद्यालयाचे देखील बोधचिन्ह असेल. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे म्हणाले, विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्याच्या मार्गातील एक महत्त्वाचा टप्पा असून महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद आणि सदस्य अमोल चव्हाण ह्यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंद तंत्रशास्त्र विद्यापीठाचे स्वप्न लवकरच साकार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



'वालचंद'चे प्र. संचालक डॉ. उदय दबडे यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्र दिले. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, सचिन मेनन, व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

# 'वालचंद'ला अधिकार प्रदत्त स्वायत्तेचा दर्जा

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : जगभर नावलौकिक असलेल्या येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडून अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय (इम्पॉवर ऑटोनॉमस कॉलेज) असा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास हा दर्जा मिळाल्यामुळे महाविद्यालयातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय अशा दोघांतर्फे संयुक्त पदवी प्रदान होणार आहे. प्रमाणपत्रावर विद्यापीठाच्या बोधचिन्हासोबत महाविद्यालयाचे बोधचिन्ह असणार आहे. यावेळी सचिन मेनन, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

# ‘वालचंद’ला प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा

**■ सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. ३ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (Empowered Autonomous College) दर्जा प्रदान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी प्रमाणपत्र स्वीकारले. यानिमित्ताने वालचंद महाविद्यालयाने स्वतंत्र तंत्रज्ञान विद्यापीठ होण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असेल.


१९४७ मध्ये स्थापन झालेले वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय तेव्हाच्या स्वतंत्र भारतातील पहिल्या काही अभियांत्रिकी महाविद्यालयांतील एक होते. गेल्या पाऊण शतकात ‘वालचंद’च्या विद्यार्थ्यांनी स्वतंत्र भारताच्या उभारणीत मोठे योगदान दिले आहे. पुढे, शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ‘वालचंद’ संलग्न झाले. २००७ मध्ये महाविद्यालयाने स्वायत्त दर्जा प्राप्त केला. त्यानंतर तंत्रज्ञान परिषदेने ‘टेक्वीफ’ अंतर्गत तीस कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यातून विविध शाखांच्या अद्ययावत प्रयोगशाळा विकसित झाल्या. असा दर्जा प्राप्त करणारे ‘वालचंद’ राज्यातील पहिल्या चार स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयापैकी एक होते. यानिमित्ताने महाविद्यालयाने स्वतंत्र अभ्यासक्रमाची रचना करण्यापासून अध्यापनाच्या विविध पातळीवर प्रयोग केले. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाल्या. विविध अडचणींवर मात करीत महविद्यालयाने लौकिक कायम राखला. गत आठवड्यात प्रशासकीय परिषदेचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी भविष्यात स्वतंत्र विद्यापीठ म्हणून ‘वालचंद’ पुढे येईल, असा आशावाद व्यक्त केला. त्यानंतर काही दिवसांतच शिवाजी विद्यापीठाने ‘प्रदत्त स्वायत्त महाविद्यालया’चा दर्जा दिला. त्यामुळे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली अशा दोघांतर्फे संयुक्त पदवी प्रदान केली जाईल आणि विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाच्या बोधचिन्हासह महाविद्यालयाचेही बोधचिन्ह असेल. हा एक मोठा टप्पा असून, विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्याच्या मार्गातील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे डॉ. उदय दबडे यांनी सांगितले.

डॉ. दबडे म्हणाले, “ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, स्थानिक सदस्य अमोल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंद तंत्रशास्त्र विद्यापीठाचे स्वप्न लवकरच साकार होईल. त्यादृष्टीने एक पाऊल पडले आहे. येत्या काळात महाविद्यालयातर्फे तंत्रज्ञान शाखेतील प्रगत असे कोर्सेस सुरू होतील. महाविद्यालयाला अभ्यासक्रम अध्यापनाची स्वायत्तता आहे. आता परदेशी विद्यापीठांसह तसेच स्थानिक कला, वाणिज्य महाविद्यालयांसमवेत सहकार्य करार करून अदानप्रदानाची सोय असेल. आता आमची वाटचाल स्वतंत्र तंत्रज्ञान विद्यापीठ होण्याच्या दिशेने असेल. कौन्सिलचे सर्व सदस्य, प्राध्यापकांच्या सहभागानेच हे यश प्राप्त झाले आहे.”



**कोल्हापूर :** येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना ‘वालचंद’चे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे व अन्य.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला ॲटोनॉमस दर्जा



सांगली : वॉलचंद महाविद्यालयाचे प्रा. उदय दबडे, सचिन मेनन यांना ॲटोनॉमस कॉलेज दर्जा प्रमाणपत्र बहाल करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. सोबत कुलसचिव व्ही. एन. शिंदे व डॉ. पी. एस. पाटील.

प्रतिनिधी
सांगली

संपूर्ण जगात नावलौकिक असलेल्या येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (Empowered Autonomous College) दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

त्यामुळे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली अशा दोघांतर्फे संयुक्त पदवी प्रदान केली जाईल आणि विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाच्या बोधचिन्हासोबत महाविद्यालयाचे देखील बोधचिन्ह असेल. हा एक मोठा टप्पा असून विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्याच्या मार्गातील एक महत्त्वाचा टप्पा असून महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष श्री. अजित गुलाबचंद आणि सदस्य श्री. अमोल चव्हाण ह्यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंद तंत्रशास्त्र विद्यापीठाचे स्वप्न लवकरच साकार होईल, असा विश्वास महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे ह्यांनी व्यक्त केला.

विनया गोरे : सांगलीत पुस्तकाविषयी संवादसत्र

# भारतीय संस्कृतीमुळेच जीवनाचा पाया भक्कम

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** मूळच्या सांगलीच्या; पण ५० वर्षांहून अधिक काळ अमेरिकेत वास्तव्य केलेल्या विनया गोरे यांचा थक्क करणारा, प्रेरणादायी जीवनप्रवास सांगलीकरांसमोर उलगडला. या दीर्घ जीवनप्रवासाची कहाणी सांगणाऱ्या 'विनया गोरे ते विनया गोर' या पुस्तकावरील संवादसत्र वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात रंगले. रंगकर्मी प्राची गोडबोले यांनी गोरे यांच्याशी संवाद साधला.



सांगलीत वालचंद महाविद्यालयात 'विनया गोरे ते विनया गोर' पुस्तकावरील संवादसत्रास गोरे यांच्यासह प्राची गोडबोले, प्रा. श्रीराम कानिटकर, डॉ. उदय दबडे, चिदंबर कोटीभास्कर, डॉ. दिलीप पटवर्धन, प्रसाद जोग, नितीन सावगावे उपस्थित होते.

गोरे यांनी सांगलीविषयीच्या उत्कट आठवणींनाही यावेळी उजाळा दिला. 'सांगली ते अमेरिका' हा प्रवास उपस्थितांसमोर साकारला. त्या म्हणाल्या, 'अमेरिकेच्या जीवनात एकरूप होतानाही भारतीय संस्कृतीशी पाळेमुळे घट्ट ठेवली. नव्या पिढीनेही आपल्या संस्कृतीचे भान ठेवूनच अमेरिकेत पाऊल ठेवावे. दोन्ही संस्कृतींमध्ये संघर्ष होणार नाही याची काळजी घेत समतोल साधला, त्यामुळे सांगलीतील विनया गोरे अमेरिकेत विनया गोर म्हणून स्थिरावली. भारतासह अन्य देशांत संशोधन क्षेत्रात वर्चस्व गाजवताना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. पण त्यांना जिद्दीने तोंड दिले. युरोप, अमेरिका असा प्रवास केला. माझ्या पुस्तकात याच्या आठवणी जागोजागी आहेत. जगभरात वर्चस्व गाजवू पाहणाऱ्या भारतीयांसाठी, विशेषतः सांगलीकर नव्या पिढीसाठी तो मार्गदर्शक दस्तावेज ठरेल'.

वालचंद महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक संघटनेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. श्रीराम कानिटकर, चितळे समूहाचे गिरीश चितळे, वालचंदचे संचालक डॉ. उदय दबडे, चिदंबर कोटीभास्कर, डॉ. दिलीप पटवर्धन, प्रसाद जोग, प्रा. नितीन सावगावे, डॉ. दिलीप पटवर्धन, डॉ. माधवी पटवर्धन, अनुजा कुलकर्णी आदी उपस्थित होते. गोरे यांनी आत्मचरित्राची मराठी आणि इंग्रजी आवृत्ती नगरवाचनालयासह काही संस्थांना भेट दिली.

# 'विज्ञानवारी' कार्यशाळेला प्रतिसाद जवळपास १३२ विद्यार्थ्यांचा सहभाग



सांगली : कार्यशाळेप्रसंगी उपस्थित वालचंद अभियांत्रिकी व विलिंग्डन महाविद्यालयातील विद्यार्थी.

**प्रतिनिधी**
सांगली

नवीनतम राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रम अंतर्गत आणि समुदाय प्रतिबद्धता कार्यक्रमाअंतर्गत मराठी विज्ञान परिषद मुंबई आणि सांगली यांच्यावतीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील द्वितीय वर्ष संगणक शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या विज्ञानवारी कार्यशाळेला प्रतिसाद मिळाला. वालचंद अभियांत्रिकीत पार पडलेल्या कार्यशाळेत वालचंद व विलिंगडन महाविद्यालयातील १३२ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांनी ८० विविध विज्ञान प्रयोग स्वत: करून पाहिले. यापुढे प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी हे 'युवा विज्ञान प्रसारक' या भूमिकेतून जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जाऊन पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणार आहेत. या उपक्रमासाठी प्रा. डॉ. अनिल सुर्वे आणि सुनील देशपांडे यांनी संयोजन केले. कार्यक्रमासाठी डॉ.एम.ए.शहा, ए.ए.उरुणकर, व्ही.आर.माळी, आर. जी.पुजारी, प्रा. पडल, यश किणीकर आणि वेदिका म्हाटकर यांचेही सहकार्य लाभले. कार्यशाळेसाठी प्रकाश मोडक, सौ.सुचिता भिडे, सौ. अनघा वक्ते, सौ.शुभदा वक्ते आदींनी मार्गदर्शन केले.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसीय मार्गदर्शन सत्र



**जनप्रवास : सांगली**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथे १७ सप्टेंबर २०२४ ते २१ सप्टेंबर २०२४ दरम्यान प्रथम वर्षाच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसीय मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा इतिहास, श्रेयांक संरचना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, विविध विभागांची माहिती तसेच महाविद्यालयीन सुविधा यांची ओळख करून देण्यात आली.

महाविद्यालयीन वक्त्यांशिवाय अन्य अनेक वक्ते या कार्यक्रमाला लाभले ज्यात विवेक पवार, शेखर पाटील, ऋषभ अक्कीवाटे, प्रा. कदम यांचा समावेश होता.या सत्रात आय. ए. एस. अधिकारी श्रीमती तृप्ती धोडमिसे आणि आय. पी. एस. अधिकारी संदीप घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. सत्राच्या उद्घाटन व स्वागत समारंभाच्या वेळी प्रभारी संचालक प्रा. उदय दबडे यांनी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वारसा, इतिहास आणि पायाभूत सुविधांची माहिती दिली.

संस्था आणि राष्ट्र उभारणीत अभियंत्यांची भूमिका ही कशी महत्वाची आहे, याचे त्यांनी मार्गदर्शन केले. संपूर्ण पाच दिवसांत प्रत्येक विभाग प्रमुख, डीन आणि सी. ओ. इ. यांनी विभाग आणि विभागांची व तेथील सोयी-सुविधांची थोडक्यात माहिती सादर केली.१९ सप्टेंबर २०२४ रोजी श्रीमती तृप्ती धोडमिसे यांचे सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या वैयक्तिक प्रवासाची माहिती दिली, ज्यामध्ये त्यांनी नोकरी करत असताना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी तयारी करायची हे कसे ठरविले. त्यांनी विद्यार्थ्यांशी मारलेल्या गप्पांमध्ये आपल्या ध्येयाचा शोध घेणे, स्पर्धा परीक्षांसाठी तयारी कशी करावी, सातत्य आणि प्रेरणा कशी टिकवावी, या बाबींवर विशेष भर दिला.

# 'वालचंद'च्या मार्गदर्शन शिबिराचा विद्यार्थ्यांना लाभ

■सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. २२ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय मार्गदर्शन शिबिराचा विद्यार्थ्यांना लाभ झाला. प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची येथे उपस्थिती होती. महाविद्यालयाचा इतिहास, श्रेयांक संरचना, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, विविध विभागांची माहिती; तसेच महाविद्यालयीन सुविधा यांची ओळख करून देण्यात आली. महाविद्यालयीन वक्त्यांशिवाय अन्य अनेक वक्ते उपस्थित होते. त्यात विवेक पवार, शेखर पाटील, ऋषभ अकिवाटे, प्रा. कदम यांचा समावेश होता. या सत्रात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे आणि पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सत्राचे उद्‌घाटन व स्वागत समारंभाच्या वेळी प्र. संचालक प्रा. उदय दबडे यांनी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वारसा, इतिहास आणि पायाभूत सुविधांची माहिती दिली. अजित गुलाबचंद आणि प्रशासकीय परिषद सदस्यांच्या नेतृत्वाखाली घडलेल्या अलीकडच्या काळातील प्रगतीचा आढावा त्यांनी सादर केला.

संपूर्ण पाच दिवसांत प्रत्येक विभाग प्रमुख, डीन आणि सी.ई.ओ. यांनी विभाग आणि विभागांची व तेथील सोयी-सुविधांची थोडक्यात माहिती सादर केली. यंदा वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन या नवीन पदवी अभ्यासक्रमांची भर घातली आहे. तसेच संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागासाठी ९० आणि माहिती तंत्रज्ञान शाखेसाठी ६० विनाअनुदानित जागांची वाढ करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मारुती खोत, प्रा. अनिल पोवार व सहकाऱ्यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. उदय दबडे, रजिस्ट्रार प्रा. सुनील ताह्मणकर, सर्व विभाग प्रमुख, डीन आणि प्रशासकीय परिषद सदस्य यांचे मार्गदर्शन मिळाले.



मिरज : मराठी विज्ञान परिषद मुंबई आणि सांगली यांच्या समन्वयाने 'शनिवारी विज्ञानवारी' उपक्रम चालू केला आहे.

# महावीर स्टेट अकॅडमी येथे 'शनिवारी विज्ञानवारी' कार्यक्रम

**केसरी वृत्तसेवा**

**मिरज :** मराठी विज्ञान परिषद मुंबई आणि सांगली यांच्या समन्वयाने 'शनिवारी विज्ञानवारी' उपक्रम चालू केला आहे. सांगली जिल्ह्यातील बऱ्याच शाळेमध्ये हा उपक्रम चालू आहे. मराठी विज्ञान परिषदेने यावर्षी सांगलीमध्ये प्रथमच वालचंद अभियांत्रिकी आणि विलिंग्डन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना विज्ञानाची कार्यशाळा घेऊन युवा विज्ञान प्रसारक बनवले. महावीर स्टेट अकॅडमी कसबे डिग्रज या सी.बी.एस.ई शाळेत विज्ञान परिषदेचे प्रयोग शिकवले, यामध्ये युवा विज्ञान प्रसार मुलांनी खूप छान पद्धतीने विद्यार्थ्यांना प्रयोग करून दाखवले व त्यांच्याकडून प्रयोग करून देखील घेतले. मराठी विज्ञान परिषदेचे सांगली जिल्हा संघटक आणि समन्वयक सुनील देशपांडे तसेच, डॉ सुर्वे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. उपक्रमाला अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष डी. डी. चौगुले, संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील तसेच मुख्याध्यापिका निर्मला मोटे व वंदना शिरोटे उपस्थित होते.

# 'वालचंद'मध्ये उद्यापासून 'टेक्नोफ्युजन २०२४' स्पर्धा

## 'सकाळ' माध्यम प्रायोजक : चार इव्हेंट होणार

सांगली, ता. ३ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या साईट क्लबतर्फे राष्ट्रीयस्तरावरील भव्य 'टेक्नोफ्युजन २०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ५ आणि ६ ऑक्टोबरला (शनिवार आणि रविवार) या दोन दिवशी तांत्रिक स्पर्धा होणार आहेत. 'सकाळ माध्यम समूह' या स्पर्धेचे माध्यम प्रायोजक आहे. याबाबत महाविद्यालयाचे संचालक उदय दबडे यांनी ही माहिती दिली आहे.

पत्रकात म्हटले आहे की, दोन दिवसांच्या या स्पर्धेत एकूण चार इव्हेंट आहेत. अभियांत्रिकी तसेच संगणक क्षेत्रातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. देशस्तरावर आपल्यातील कौशल्य प्रदर्शनाची ही संधी आहे. हा सर्वांसाठी खुला इव्हेंट आहे. विविध तांत्रिक-अतांत्रिक स्पर्धा आणि कार्यशाळा आयोजित केल्या आहेत.

बीड टू बिल्ड, जोडीने कोडिंग स्पर्धा, क्लाउडव्हर्स, क्लाउड कम्प्युटिंग वर्कशॉप, कोडक्रश ऑनलाइन कोडिंग स्पर्धा आहे. वैयक्तिक तसेच समूहाने या स्पर्धांत सहभाग घेता येईल. विजेत्यांना अडीच लाखांपर्यंतची पारितोषिके आहेत. तंत्रज्ञानात रस असलेल्या विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश आहे.


नोंदणी शुल्क भरण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी techfusion.wcesait.org या संकेतस्थळावर भेट द्या. अधिक माहितीसाठी प्रथमेश पाटीलः ७०२०४२१३८३, वेदांत लोणकरः ९१५६९८३३६९ यांच्याशी संपर्क साधा.

# 'वालचंद'मध्ये 'प्रुडेन्स', 'टेकफ्युजन' सुरू

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ६ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रुडेन्स-२०२४ आणि टेकफ्युजन-२०२४ उपक्रमांची उत्साहात सुरुवात झाली. जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल ओसवाल प्रमुख उपस्थित होते. 'पेस'तर्फे आयोजित हा उपक्रम दोन दिवस चालेल.

प्रुडेन्स हा व्यक्तिमत्त्व विकासाशी अनुषंगिक कार्यक्रम होत आहे. त्यात ॲस्पायर, नितीग्य, आयडियाथॉन आणि स्टँडआऊट असे वेगवेगळे विभाग आहेत. टेकफ्युजन हा विद्यार्थ्यांच्या तांत्रिक तंत्रज्ञानविषयक बुद्धिमत्तेला चालना देणारा उपक्रम आहे. त्यात बिड टू बिल्ड, नेटवर्स, क्लाऊडवर्स अशा स्पर्धा आहेत.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील 'पेस'च्या उपक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, अतिरिक्त सीईओ निखिल ओसवाल.

प्रुडेन्ससाठी राज्यभरातून ६५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. टेकफ्युजनमध्ये ३५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे सदस्य अमोल चव्हाण आणि प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. शरद गायकवाड, प्रा. मनीष नरनवरे यांनी आयोजन केले. पेसचे अध्यक्ष अवधूत कुळकर्णी, उपाध्यक्ष शशांक पुजारी, सचिव विश्वजित सरवदे, सैटचे अध्यक्ष पराग पाटकळकर, उपाध्यक्ष प्राप्ती गावंडे, सचिव वेदांत देवताळे, प्रथमेश पाटील यांनी नियोजन केले. माहिती व तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. रवींद्र राठोड, निबंधक डॉ. सुनील ताह्मणकर आणि प्रा. संजय धायगुडे उपस्थित होते.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात 'टेक्यूमेन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. जनप्रवास (सांगली) पा. नं. ५ दि: १८-१०-२४

**जनप्रवास । सांगली**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील ॲक्सेस क्लबने १२ व १३ ऑक्टोबर रोजी 'टेक्यूमेन' या तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात तांत्रिक आणि गैर-तांत्रिक अशा चार उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य पाहुणे माजी विद्यार्थी शिवम धनाढ्य यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य वाढवण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. वेबनॅटिक या कार्यशाळेत एच टी एम एल, सी एस एस, आणि टेलविंड या वेब डेव्हलपमेंट तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करण्यात आले. यात सहभागी विद्यार्थ्यांनी वेब डिझाइन आणि विकास क्षेत्रात आपले कौशल्य अवगत केले.

'कोडब्लास्ट' हा ऑनलाइन कोडिंग स्पर्धा होता, ज्यात विद्यार्थ्यांनी आपल्या प्रोग्रामिंग कौशल्यांचे प्रदर्शन केले. 'कंपाईल इट' हा ऑफलाइन कोड डिबगिंग स्पर्धा होता, ज्यात विद्यार्थ्यांनी कोडमधील चुकांचे निराकरण केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी 'पझल व्हॉल्ट' नावाचा गैर-तांत्रिक उपक्रम झाला. या उपक्रमात ३ राउंड असलेल्या मजेदार आणि मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रायोजक 'युनिव्हर्स गेमझोन' होते, ज्यात विद्यार्थी बॉलिंग यांसारखे खेळ खेळू शकतात.

कार्यक्रमाचे आयोजन प्रामुख्याने ओम कुलकर्णी मीहीका राजपूत मिहीर पुसदकर या विद्यार्थीनि विद्याशाखा सल्लागार डॉ अनिल सुर्वे यांचे समवेत यशस्वीरित्या पार पडले. आयोजकांनी सर्व सहभागी, मुख्य पाहुणे 'शिवम धनाढ्य' आणि प्रायोजकांचे आभार मानले. ओमर तेरदाळकर, विभाग प्रमुख डॉ मेधा शाह, प्रभारी संचालक डॉ उदय दबडे तसेच व्यवस्थापन प्रतिनिधी अमोल चवाण यांचेही सहकार्य लाभले.

# 'वालचंद'मध्ये टेक्यूमेन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**केसरी वृत्तसेवा**

**सांगलीः** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील ॲक्सेस क्लबने 'टेक्यूमेन' या तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात तांत्रिक आणि गैर–तांत्रिक अशा चार उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य पाहुणे माजी विद्यार्थी शिवम धनाढ्य यांच्याहस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य वाढवण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. वेबनॅटिक या कार्यशाळेत एचटीएमएल, सीएसएस, आणि टेलविंड या वेब डेव्हलपमेंट तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करण्यात आले. यात सहभागी विद्यार्थ्यांनी वेब डिझाइन आणि विकास क्षेत्रात आपले कौशल्य अवगत केले.

कोडब्लास्ट ही ऑनलाइन कोडिंग स्पर्धा होती, ज्यात विद्यार्थ्यांनी आपल्या प्रोग्रामिंग कौशल्यांचे प्रदर्शन केले. कंपाईल इट हा ऑफलाइन कोड डिबगिंग स्पर्धा होता, ज्यात विद्यार्थ्यांनी कोडमधील चुकांचे निराकरण केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी 'पझल व्हॉल्ट' नावाचा गैर–तांत्रिक उपक्रम झाला. या उपक्रमात ३ राउंड असलेल्या मजेदार आणि मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रायोजक युनिव्हर्स गेमझोन होते, ज्यात विद्यार्थी बॉलिंग यांसारखे खेळ खेळू शकतात.

याचे संयोजन ओम कुलकर्णी , मीहीका राजपूत, मिहीर पुसदकर , विद्याशाखा सल्लागार डॉ. अनिल सुर्वे यांनी केले होते.

# कोरियाच्या प्राध्यापकांशी वैचारिक देवाणघेवाण

## भारतातील प्रतिनिधींची सोलमधील क्वांगवून विद्यापीठाला भेट

Sakal EDUCON 2024 | South Korea




**सोल (दक्षिण कोरिया) :** 'सकाळ'तर्फे आयोजित 'एज्युकॉन २०२४' दरम्यान भारतीय शिक्षण संस्थांच्या प्रतिनिधींनी क्वांगवुन विद्यापीठातील संशोधन केंद्र, प्रयोगशाळा यांना भेट दिली.

**पुणे / सोल (दक्षिण कोरिया), ता. २२ :** दक्षिण कोरियातील औद्योगिक क्रांतीची साक्षीदार असलेली शिक्षण व्यवस्था समजून घेत, जागतिक पातळीवरील ज्ञानप्रणालीतील नव्या प्रवाहांसह संशोधनातील नावीन्यपूर्ण प्रयोगाचा वेध घेत, उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपलब्ध संधींबाबत भारतीय आणि दक्षिण कोरियातील प्राध्यापकांमध्ये वैचारिक देवाणघेवाण झाली. निमित्त होते 'सकाळ' आयोजित 'एज्युकॉन २०२४' या शैक्षणिक परिषदेच्या पहिल्या दिवसाचे.

ही परिषद यंदा दक्षिण कोरियात होत आहे. या परिषदेत भारतातील सुमारे ३५ पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थांमधील संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक सहभागी झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील या मान्यवरांनी सोमवारी दक्षिण कोरियाची राजधानी असलेल्या सोल शहरातील क्वांगवून विद्यापीठाला भेट दिली.

या भेटीदरम्यान 'सकाळ माध्यम समूहा'च्या संचालक जान्हवी पवार, क्वांगवून विद्यापीठाच्या परराष्ट्र व्यवहार विभागाचे उपाध्यक्ष डॉ. सांग वॉन मीन, विद्यापीठाच्या इलेक्ट्रोबायोफिजिक्स विभागाचे प्राध्यापक डॉ. नागेंद्र कौशिक, प्राध्यापक डॉ. दिनेश अमळनेरकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान भारतातील शिक्षण संस्थांच्या प्रतिनिधींनी क्वांगवुन विद्यापीठातील शिक्षणप्रणालीची माहिती जाणून घेतली. विद्यापीठात होणारे संशोधन, नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम, अत्याधुनिक प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, शिक्षणपद्धती याबाबत प्राध्यापकांमध्ये विचारमंथन झाले. या वेळी भारतीय प्राध्यापकांनी प्लाझ्मा बायो रिसर्च सेंटर, सेमीकंडक्टर लॅब, वसतीगृह, आईस रिंक लायब्ररी या ठिकाणांना भेट दिली.

या वेळी मार्गदर्शन करताना डॉ. सांग वॉन मिन म्हणाले, "२०२४ मध्ये क्वांगवुन फाउंडेशनचा ९० वा वर्धापन दिन आहे. 'सकाळ' आयोजित 'एज्युकॉन' या शैक्षणिक परिषदेच्या माध्यमातून भारतातील विविध शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींनी विद्यापीठाला भेट दिली. गेल्या ९० वर्षांत हे विद्यापीठ एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून विकसित झाले आहे. हे विद्यापीठ माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यातील शिक्षण आणि संशोधनाला प्राधान्य देणारे आहे."

> परदेशी विद्यापीठांसमवेत शैक्षणिक देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. एखादी छोटी सुरवात देखील जगात अकल्पनीय बदल घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते, या संकल्पनेला 'बटरफ्लाय इफेक्ट' म्हणतात. 'सकाळ' आयोजित शैक्षणिक परिषदेतूनही अशाप्रकारे 'बटरफ्लाय इफेक्ट' घडविणारा बदल होईल.
>
> **- डॉ. सांग वॉन मीन,** उपाध्यक्ष, परराष्ट्र व्यवहार, क्वांगवून विद्यापीठ

> दक्षिण कोरियातील विद्यापीठात नॅचरल सायन्सेस अशा शिक्षणावर भर आहे. याशिवाय नॅनो डिवाईज ॲप्लिकेशन्स, ह्यूमन ब्रेन न्युरोकॉम्प्युटिंग, इंटेलिजंट रोबोट इनोव्हेशन, रिॲलिस्टिक कंटेंट टर्मिनल टेक्नॉलॉजी, प्लाझ्मा बायोसायन्स अशा विषयांत संशोधनात अग्रेसर असणारे हे विद्यापीठ आहे.
>
> **- डॉ. नागेंद्र कौशिक,** प्राध्यापक, इलेक्ट्रोबायोफिजिक्स विभाग

# 'वालचंद अभियांत्रिकी'त 'आकार-२०२४' उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. २२ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेमार्फत प्रतिवर्षी ''आकार-२०२४'' हा राष्ट्रीय स्तरावरील तंत्रज्ञानविषयक संमेलन उत्साहात झाले. 'उद्‌गम शाश्वत नवोपक्रमाचा स्रोत' अशी मध्यवर्ती थीम होती. शाश्वत स्थापत्य अभियांत्रिकी वाटचाल हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता.

दोन दिवसांच्या या उपक्रमात 'आकार'ची सुरुवात शुक्रवारी (ता. १८) झाली. प्रवास ब्लॉगर कौस्तुभ पूर्व यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन झाले.

१९ ऑक्टोबर रोजी स्थापत्य शाखेचे विभागप्रमुख डॉ. जी. आर. मुतवल्ली, अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेचे सल्लागार डॉ. डी. एस. चव्हाण, बीएसएनएलचे सरव्यवस्थापक विनय जांभळी यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले.




सांगली : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य शाखेच्या वतीने आयोजित 'आकार-२०२४' उपक्रमात सहभागी स्पर्धक विद्यार्थी.

आकार २०२४ मध्ये ११०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या दरम्यान प्रामुख्याने अकरा विविध प्रतियोगिता एक कार्यशाळा, तसेच दोन शालेयस्तरावरील प्रतियोगिता आयोजित केल्या होत्या.

यामध्ये वेक्टरकॅड ऑटोकॅड कॉम्पिटिशन, गेटपत्ता गेट या स्पर्धा झाल्या. स्पर्धा परीक्षा विषयक युवा संसद हा उपक्रम झाला. हायरवेव्ह कॅम्पस भरती प्रक्रिया, प्रस्तुती प्रेझेंटेशन स्पर्धा, स्ट्रक्टरोस्टिमा ब्रिज, आर्च मेकिंग कॉम्पिटिशन, बिल्डक्राफ्ट ऑन द स्पॉट स्ट्रक्चर मेकिंग कॉम्पिटिशन, सरकारी परीक्षा प्रक्रिया, फाउंडर्स आर्टिस्टीक ब्रेनवेव, यशोधन कंन्स्ट्रोलॅबचे सुधीर हंजे यांची बांधकाम क्षेत्रातील शाश्वत तंत्रज्ञान कार्यशाळा झाली. या सर्व कार्यक्रमांमधून स्पर्धक विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात तसेच भविष्यात व्यावसायिक जीवनासाठी उपयोगी पडेल, अशी रचना करण्यात आली होती. विद्यार्थी संघटनेचे सल्लागार डॉ. डी. एस. चव्हाण, कोटिभास्कर बिल्डर्सचे संचालक चिंदबर कोटिभास्कर उपस्थित होते. प्रभारी संचालक डॉ. यु. ए. दबडे, सहयोगी डीन विद्यार्थी विभाग डॉ. एम. एम. खोत, स्थापत्य शाखेचे विभागप्रमुख डॉ. जी. आर. मुनवल्ली, स्थापत्य अभियांत्रिकीचे विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यश पुजारी, सानिका पाटील, सई माने, अमन मालगावे यांच्या टीमने संयोजन केले.

# 'वालचंद', 'सी-डॅक'मध्ये सामंजस्य करार



**सांगली** : वालचंद अभियांत्रिकी व सी-डॅक यांच्यात सामंजस्य कराराप्रसंगी उपस्थित मान्यवर.

**सांगली, ता. १२** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय (सांगली) आणि प्रगत संगणकीय विकास केंद्र (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग- सी-डॅक) (पुणे) यांच्या सहकार्याने उच्च कार्यक्षम संगणकीय (हाय परफॉर्मन्स कॉम्प्युटिंग- एचपीसी) आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी समर्पित राष्ट्रीय सुपरकंप्युटिंग मिशन (एनएसएम) योजनेंतर्गत वालचंद महाविद्यालयात नोडल केंद्र सुरू करण्यासाठी सामंजस्य करार (एमओए) झाला आहे. हा करार भारताच्या सुपरकंप्युटिंग आणि ए.आय. संशोधन क्षेत्रात प्रगतीत मैलाचा दगड ठरू शकतो.

प्रगत संगणकीय विकास केंद्र (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग - सी-डॅक (पुणे) येथे हा कार्यक्रम झाला. कार्यकारी संचालक संजय वांधेकर, शास्त्रज्ञ आशीष कुवेलकर उपस्थित होते. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे प्रशासकीय परिषदेचे सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण यांच्यासह संचालक डॉ. उदय दबडे, संगणक अभियांत्रिकी शास्त्र आणि आय. टी. विभागाचे प्रमुख डॉ. मेधा शाह, डॉ. रवींद्र राठोड, डॉ. उमेश चव्हाण उपस्थित होते. वालचंद अभियांत्रिकीचे प्रा. दिनेश कुलकर्णी यांची राष्ट्रीय सुपरकंप्युटिंग मिशनसाठी (एनएसएम) नोडल केंद्राचे समन्वयक म्हणून नियुक्ती झाली. राष्ट्रीय सुपर कंप्युटिंग मिशन (एनएसएम) २०१५ हा उपक्रम सुपर कंप्युटिंग क्षेत्रामध्ये आत्मनिर्भरता प्राप्त करणे व वैज्ञानिक संशोधन वाढविणे यासाठी सुरू करण्यात आला. मोहिमेअंतर्गत ३० संस्थांत संगणकीय शक्तीचे ३० पेटा फ्लॉप क्षमतेचे संगणकीय जाळे यशस्वीरीत्या स्थापित केले आहे. ज्यामुळे आठ हजारांहून अधिक संशोधकांना फायदा झाला आहे.

आयआयटी (खरगपूर), आयआयटी (पलक्कड), आयआयटी (चेन्नई), आयआयटी (गोवा), डीटीयूया पाच केंद्रांव्यतिरिक्त, आता वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय (सांगली) येथे असे सहावे एचपीसी नोडल केंद्र स्थापन करण्यात आले आहे. त्याचा लाभ संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापकांसाठी होणार असून, तांत्रिक क्षेत्रांमधील प्रगतीला प्रोत्साहन मिळणार आहे.



सांगलीतील वालचंद महाविद्यालय व सी-डॅकमध्ये पुणे येथे सामंजस्य करार झाला. यावेळी दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# वालचंद कॉलेज-सी-डॅक यांच्यात सामंजस्य करार

**सांगली :** प्रगत संगणकीय विकास केंद्र (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग, सी-डॅक) पुणे यांच्या सहकार्याने उच्च कार्यक्षम संगणकीय आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी राष्ट्रीय सुपरकम्प्युटिंग मिशन योजनेंतर्गत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथे नोडल केंद्र सुरू करण्यासाठी सामंजस्य करार झाला. पुणे येथे हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी कार्यकारी संचालक संजय वांधेकर, आशिष कुवेलकर उपस्थित होते, तर वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने प्रशासकीय परिषदेचे सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण, डॉ. उदय दबडे, डॉ. मेघा शाह, डॉ. रवींद्र राठोड, डॉ. उमेश चव्हाण उपस्थित होते. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. दिनेश कुलकर्णी यांची राष्ट्रीय सुपरकम्प्युटिंग मिशनसाठी नोडल केंद्राचे समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. (वा.प्र)

# वालचंद अभियांत्रिकी आणि सीडॅक यांच्यात करार

**केसरी वृत्तसेवा**

**सांगलीः** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली आणि प्रगत संगणकीय विकास केंद्र (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग- CDAC) पुणे यांच्या सहकार्याने उच्च कार्यक्षम संगणकीय (हाय परफॉर्मन्स कॉम्पुटिंग-HPC) आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी समर्पित राष्ट्रीय सुपरकंप्युटिंग मिशन (NSM) योजने अंतर्गत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथे नोडल केंद्र सुरू करण्यासाठी सामंजस्य करार (MO-) झाला आहे. हा करार भारताच्या सुपरकंप्युटिंग आणि ए. आय. संशोधन क्षेत्रातील प्रगतीमधील मैलाचा दगड ठरू शकतो .

संधीची नवी क्षितिजे

प्रगत संगणकीय विकास केंद्र (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग - CD-C) पुणे येथे हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी कार्यकारी संचालकश्री संजय वांधेकर, शास्त्रज्ञ आशिष कुवेलकर उपस्थित होते, तर वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयच्यावतीने प्रशासकीय परिषदेचे सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण यांच्यासह संस्थेचे संचालक डॉ. उदय दबडे, संगणक अभियांत्रिकीशास्त्र आणि आय. टी.विभागाचे प्रमुख डॉ. मेधा शाह, डॉ. रवींद्र राठोडआणि डॉ. उमेश चव्हाण उपस्थित होते. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयचे प्रा. दिनेश कुलकर्णी यांची राष्ट्रीय सुपरकंप्युटिंग मिशनसाठी (छड्य) नोडल केंद्राचे समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय सुपर कंप्युटिंग मिशन २०१५ हा उपक्रम सुपर कंप्युटिंग क्षेत्रामध्ये आत्मनिर्भरता प्राप्त करने व वैज्ञानिक संशोधन वाढवणे या हेतूसाठी सुरू करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत ३० संस्थांमध्ये संगणकीय शक्तीचे ३० पेटा फ्लॉप क्षमतेची संगणकीय जाळे यशस्वीरित्या स्थापित केले आहेत, ज्यामुळे ८००० हून अधिक संशोधकांना फायदा झाला आहे. आयआयटी खरगपूर, आयआयटी पलक्कड, आयआयटी चेन्नई, आयआयटी गोवा, डीटीयू या पाच केंदाव्यतिरिक्त, आता वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली असे राहावे. एचपीसी नोडल केंद्र स्थापन करण्यात आले आहे.



सांगली : वालचंद महाविद्यालय व सी-डॅक यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. यावेळी संजय वांधेकर, आशिष कुवेलकर, चकोर गांधी उपस्थित होते.

# वालचंद महाविद्यालय, सी-डॅक यांच्यामध्ये सामंजस्य करार

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली आणि प्रगत संगणकीय विकास केंद्र (सी-डॅक) पुणे यांच्या सहकार्याने उच्च कार्यक्षम संगणकीय आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी समर्पित राष्ट्रीय सुपरकंप्युटिंग मिशन योजनेअंतर्गत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय येथे नोडल केंद्र सुरू करण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे.

याप्रसंगी कार्यकारी संचालक संजय वांधेकर, शास्त्रज्ञ आशिष कुवेलकर उपस्थित होते, तर वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयच्या वतीने प्रशासकीय परिषदेचे सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण यांच्यासह संस्थेचे संचालक डॉ. उदय दबडे, संगणक अभियांत्रिकीशास्त्र आणि आय. टी.विभागाचे प्रमुख डॉ. मेधा शाह, डॉ. रवींद्र राठोड आणि डॉ. उमेश चव्हाण उपस्थित होते. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयचे प्रा. दिनेश कुलकर्णी यांची राष्ट्रीय सुपरकंप्युटिंग मिशनसाठी नोडल केंद्राचे समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

आयआयटी खरगपूर, पलक्कड, चेन्नई, गोवा, डीटीयू या पाच केंद्राव्यतिरिक्त, आता वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय असे सहावे नोडल केंद्र स्थापन करण्यात आले आहे. याचा लाभ संशोधक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी होणार असून, तांत्रिक क्षेत्रांमधील प्रगतीला प्रोत्साहन मिळणार आहे.

# वालचंद अभियांत्रिकीत शिकाऊ प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय व राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजना (एनएटीएस), बोर्ड ऑफ अॅप्रेंटिसशिप ट्रेनिंग (बोट) अंतर्गत शिकाऊ प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे.

योजनेंतर्गत बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स, बी.एस्सी मॅथेमेटिक्स, बी.एस्सी फिजिक्स, बी.एस्सी केमिस्ट्री, बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन पदवीप्राप्त २०२० ते २०२४ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी शिकाऊ प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण एक वर्षासाठी असणार आहे. विद्यार्थ्यांना प्रति महिना ९ हजार रूपये विद्यावेतन दिले जाणार आहे. या योजनेची माहिती लवकरच वालचंद महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर पहायला मिळेल. इच्छुक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजना (एनएटीएस)च्या पोर्टलवर नोंद करणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. ही योजना प्रा. डॉ. उदय दबडे, डॉ. यू. बी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत.




**मुंबई :** सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहा माजी विद्यार्थ्यांना 'वालचंद गौरव पुरस्कार २०२४' प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी डॉ. सुभाष आवळे, डॉ. प्रकाश कुलकर्णी, प्रभाताई कुलकर्णी, भास्कर सावंत आणि श्रीनिवास पाटील आदी.

# अभिजित पवार यांचा वालचंद गौरव पुरस्काराने सन्मान

## वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहा माजी विद्यार्थ्यांचा मुंबईत गौरव

**मुंबई, ता. ८ :** जगभरातील विविध संस्था अन् प्रशासनामध्ये अनेक महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असलेल्या सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहा माजी विद्यार्थ्यांना शनिवारी (ता. ७) झालेल्या एका सोहळ्यात वालचंद गौरव पुरस्कार २०२४ प्रदान करून गौरविण्यात आले. त्यात प्रामुख्याने 'सकाळ माध्यम समूहा'चे व्यवस्थापकीय संचालक आणि 'एपी ग्लोबाले'चे संस्थापक-अध्यक्ष अभिजित पवार यांच्यासह सहा जणांचा समावेश होता.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापनेला नुकतीच ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये जागतिक माजी विद्यार्थी संमेलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. डॉ. सुभाष आवळे यांना शिक्षण, डॉ. प्रकाश कुलकर्णी यांना माजी शिक्षक, प्रभाताई कुलकर्णी यांना उद्योग, भास्कर सावंत यांना सार्वजनिक सेवा आणि श्रीनिवास पाटील यांना बांधकाम अन् पायाभूत सुविधा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी वालचंद गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

संमेलन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून सनदी अधिकारी सदाशिव साळुंखे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ चकोर गांधी, उद्योजक श्रीनिवास पाटील, महाविद्यालयाचे उद्योग विभागाचे अधिष्ठाता व माजी विद्यार्थी प्रा. संजय धायगुडे, उदय नानिवडेकर आणि उदयकुमार दबडे तसेच उद्योजिका प्रभाताई कुलकर्णी, प्रो. डॉ. अरविंद देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबईसह भारतातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेले आणि महाविद्यालयाचा वारसा जपणारे माजी विद्यार्थी सहभागी झाले होते.

माजी विद्यार्थ्यांनी जगभरात वालचंद महाविद्यालयाचे नाव आणि प्रतिष्ठा जपली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यापासून ते महाविद्यालयाच्या एकूणच पायाभूत सुविधांसाठी लागणारी मदत व इतर प्रकारचे सहकार्य करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले. त्याला माजी विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. अनेक मान्यवरांनी वालचंद महाविद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर विविध क्षेत्रांत नेतृत्व करून गुणवत्तापूर्ण कार्य कसे करता आले, याबाबतची माहिती उपस्थितांना दिली. अभिजित पवार वालचंद महाविद्यालयाचे १९९४ च्या तुकडीचे विद्यार्थी. एक यशस्वी उद्योजक म्हणून वालचंद गौरव पुरस्कार २०२४ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

### पवार यांच्यातर्फे आभार



**▪ अभिजित पवार यांना मिळालेला गौरव पुरस्कार त्यांच्या वतीने 'सकाळ'चे मुख्य संपादक राहुल गडपाले यांनी स्वीकारला. पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना पवार यांनी महाविद्यालय व्यवस्थापनाचे आभार मानले. आपल्या महाविद्यालयाने केलेला सन्मान प्रेरणादायी असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.**

> 'सकाळ माध्यम समूहा'च्या माध्यमातून अभिजित पवार लाखो तरुणांना शिक्षण, प्रशिक्षण, योग, अध्यात्म आदींचे शिक्षण देत असतात. वालचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपलीकडेही त्यांचे सामाजिक क्षेत्र आणि पाणी चळवळीसोबतच योग, आयुर्वेद क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे. ते नेहमीच प्रेरणादायी असते. त्यांना आज वालचंद गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले याचा अभिमान आहे.
>
> **- प्रा. संजय धायगुडे,**
> अधिष्ठाता, उद्योग विभाग आणि माजी विद्यार्थी, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय

### पवार यांच्या कार्याची दखल

अभिजित पवार यांचे सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांनी जगातील सर्वांत मोठ्या जनसमुदायासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवला. 'तनिष्का महिला फोरम'चे संस्थापक म्हणून त्यांनी २० हजारांहून अधिक महिलांचे सक्षमीकरण केले. तेल अवीव महापालिकेच्या मदतीने स्मार्ट शहरांच्या निर्मितीसाठी विविध उपक्रम आणि पर्याय त्यांनी विकसित केले. वाहतूक कोंडीवरील पर्याय म्हणून 'पुणे बस डे'सारखे कल्पक उपक्रम राबविले. आपत्ती निवारण, शिष्यवृत्ती वाटप, युवकांमध्ये नेतृत्वाचा विकास आणि महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांत अभिजित पवार यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे. ते अंधांसाठीच्या 'द पूना स्कूल ॲण्ड होम' संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून, त्या माध्यमातून त्यांनी अंधांना आत्मनिर्भर करण्यासाठी भरीव मदत केली आहे. तसेच ते कला आणि संस्कृतीच्या प्रसारासाठी आर्ट लिडरशिप नेटवर्कच्या माध्यमातून सतत प्रयत्नशील आहेत.

# कॉलेज व माजी विद्यार्थ्यांमध्ये कृतीपूर्ण संवाद हवा

## ■ चकोर गांधी; वालचंद महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा

जनप्रवास । सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास थोर परंपरा आहे. महाविद्यालयाने विद्यार्थी घडविण्याबरोबरच त्यांच्यामध्ये स्वावलंबी जीवन जगण्याचे बळ दिले आहे. महाविद्यालयाने माजी विद्यार्थ्यांशी अधिक परिणामकारक आणि कृतीपूर्ण संवादावर भर देण्याची गरज असल्याचे मत चकोर गांधी यांनी व्यक्त केले.

नुकताच हिरक महोत्सव साजरा केलेल्या सांगली येथील जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केलेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे शनिवारी उत्साहात झाला. देशाच्या विविध भागातील सुमारे २०० माजी विद्यार्थी या मेळाव्याला उपस्थित होते.

मागील वर्षापासून महाविद्यालयाने असे माजी विद्यार्थी मेळावे म हाविद्यालयाच्या बाहेर देखील विविध शहरांमध्ये भरविण्यास सुरुवात केली आहे. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी सुरुवातीस सर्वांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी महाविद्यालयाच्या अलिकडील काळातील प्रगतीचा आढावा घेतला. तसेच नजीकच्या भविष्यात तंत्रशास्त्र विद्यापीठामध्ये महाविद्यालयाचे रुपांतर करण्याचा मनोरथ त्यांनी विशद केला.

गेल्या वर्षापासून महाविद्यालयाने विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग यश प्राप्त केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा व महाविद्यालयामध्ये ज्ञानार्जन करणा-या माजी शिक्षकांचा वालचंद गौरव पुरस्कार प्रदान करुन सन्मान करण्याची परंपरा सुरु केली आहे. प्रा. संजय धायगुडे, अधिष्ठाता यांनी यासंदर्भातील निवड प्रक्रिया सविस्तर विशद केली.

शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जेष्ठ शिक्षणतज्ञ कै. डॉ. सुभाष आवळे यांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. सुभाष आवळे हे मनुष्यबळ विकास मंत्रालयात सल्लागार, एआयसीटीई चे सदस्य सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु आणि खखच् चींलरळ मध्ये रुपांतरीत केलेल्या छखढखए मुंबईचे संचालक होते.

उद्योग क्षेत्रातून हा पुरस्कार महाविद्यालयातील पहिली महिला विद्यार्थिनी आणि सांगली येथील प्रथितयश उद्योजक सौ. प्रभाताई कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. एकमेव विद्यार्थीनी असून देखील सहा दशकापूर्वी त्यांना महाविद्यालयातील भेदभावविरहित वातावरणाचा अनुभव आल्याचे आणि नेतृत्वगुण विकसित करण्यामध्ये महाविद्यालयाचे भरीव योगदान असल्याचा त्यांनी उल्लेख केला. उद्योग क्षेत्रातील दुसरा पुरस्कार सकाळ समुहाचे व्यवस्थापकीय संचालक आणि एपी ग्लोबलचे अध्यक्ष श्री. अभिजित पवार यांना प्रदान करण्यात आला.

सार्वजनिक सेवा / शासकीय सेवा क्षेत्रातील पुरस्कार भारतीय प्रशासकीय सेवेतील राजस्थान राज्य शासनाचे प्रधान सचिव श्री. भास्कर सावंत यांना प्रदान करण्यात आला. श्री. सावंत यांनी या पुरस्कारामुळे अधिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाल्याचे सांगून महाविद्यालयाच्या प्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. पायाभूत सेवा / बांधकाम क्षेत्रातील पुरस्कार सोनई इन्फ्राचे चेअरमन, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, सांगली येथील प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक श्री. श्रीनिवास पाटील यांना प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या माजी शिक्षकांम धून हा पुरस्कार महाविद्यालयामध्ये ३७ वर्षे सेवा केलेले माजी प्राचार्य, माजी उपसंचालक प्रा. डॉ. पी. जे. कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. डॉ. कुलकर्णी हे राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचे देखील मानकरी होते. सत्काराला उत्तर देताना डॉ. कुलकर्णी यांनी वालचंद कॉलेज आणि त्यांच्यामध्ये जणू काही अव्दैताचे नाते असल्याचे नमूद केले.

महाविद्यालयातील बीई सिव्हील आणि एमई स्टक्चर चे माजी विद्यार्थी श्री. सदाशिव साळुंखे महाराष्ट्र शासनाच्या सचिव (रस्ते) या पदावर कार्यरत असून, ते या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणांत त्यांच्या ३० वर्षांच्या अभियांत्रिकी सेवेतील वाटचालीचा आढावा घेतला आणि या काळातील विविध आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी, त्यांची महाविद्यालयातील जडणघडण कारणीभूत असल्याचे नम द केले. माजी विद्यार्थ्यामध्ये अत्यंत मजबूत असे प्रभावी नेटवर्क असणेही काळाची गरज असल्याचे नमूद केले. त्यामुळे माजी विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयाला देखील प्रचंड लाभ होणार असल्याचे सांगितले.अजित गुलाबचंद यांच्यासारख्या एका कल्पक व दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली भविष्यात दैदिप्यमान वाटचाल करण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या वतीने ठोस पावले उचलण्याची ग्वाही दिली. सर्वानीच त्यांच्या जडण घडणीमध्ये असलेल्या योगदानाचा अभिमानपूर्वक उल्लेख करीत महाविद्यालयाच्या भावी वाटचालीत सर्व प्रकारचे सहकार्य करण्याची खात्री दिली.

# वालचंद आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवादावर भर : चकोर गांधी

## मुंबईत 'वालचंद'चा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुंबई येथे झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात बोलताना सदाशिव साळुंखे व उदय नानिवडेकर, महाविद्यालयाचे प्र.संचालक प्रा. उदय दबडे आदी.

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** सांगली येथील जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केलेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात झाला. देशाच्या विविध भागातील सुमारे २००हून अधिक माजी विद्यार्थी या मेळाव्याला उपस्थित होते.

मागील वर्षापासून महाविद्यालयाने असे माजी विद्यार्थी मेळावे महाविद्यालयाच्या बाहेर देखील विविध शहरांमध्ये आयोजित सुरुवात केली आहे. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी स्वागत केले. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी महाविद्यालयाच्या अलिकडील काळातील प्रगतीचा आढावा घेतला.

गेल्या वर्षापासून महाविद्यालयाने विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग यश प्राप्त केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा व महाविद्यालयामध्ये ज्ञानार्जन करणाऱ्या माजी शिक्षकांचा वालचंद गौरव पुरस्कार प्रदान करुन सन्मान करण्याची परंपरा सुरु केली आहे. प्रा. संजय धायगुडे, अधिष्ठाता यांनी यासंदर्भातील निवड प्रक्रिया सविस्तर विशद केली. शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जेष्ठ शिक्षणतज्ञ कै. डॉ. सुभाष आवळे यांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आला. मनुष्यबळ विकास मंत्रालयात सल्लागार, डॉ.सुभाष आवळे, उद्योग क्षेत्रातून हा पुरस्कार महाविद्यालयातील पहिली महिला विद्यार्थिनी आणि सांगली येथील प्रथितयश उद्योजक प्रभाताई कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. उद्योग क्षेत्रातील दुसरा पुरस्कार सकाळ समुहाचे व्यवस्थापकीय संचालक आणि एपी ग्लोबलचे अध्यक्ष अभिजित पवार यांना प्रदान करण्यात आला.

सार्वजनिक सेवा/शासकीय सेवा क्षेत्रातील पुरस्कार भारतीय प्रशासकीय सेवेतील राजस्थान राज्य शासनाचे प्रधान सचिव भास्कर सावंत यांना प्रदान करण्यात आला. पायाभूत सेवा/बांधकाम क्षेत्रातील पुरस्कार, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, सांगली येथील प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक श्रीनिवास पाटील यांना प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या माजी शिक्षकांमधून हा पुरस्कार महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, माजी उपसंचालक प्रा. डॉ. पी. जे. कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. माजी विद्यार्थी सदाशिव साळुंखे महाराष्ट्र शासनाच्या सचिव सदाशिव साळुखे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणांत त्यांच्या अभियांत्रिकी सेवेतील वाटचालीचा आढावा घेतला आणि या काळातील विविध आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी, त्यांची महाविद्यालयातील जडणघडण कारणीभूत असल्याचे नमूद केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात चकोरगांधीयांनीइतकी थोरपरंपरा असलेल्या महाविद्यालयाच्या भावी प्रगतीविषयी खात्री व्यक्त करतानाच, माजी विद्यार्थ्यांशी अधिक परिणामकारक आणि कृतीपूर्ण संवादावर भर दिला. अजित गुलाबचंद यांच्यासारख्या एका कल्पक व दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली भविष्यात दैदिप्यमान वाटचाल करण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या वतीने ठोस पावले उचलण्याची ग्वाही दिली.

ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलचे सदस्य अमोल चव्हाण यांनी समारोपन भाषणांमध्ये माजी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा सध्याच्या विद्यार्थ्यांना आणि संस्थेला फायदा होण्याच्या दृष्टीने निश्चित कालबध्द कार्यक्रम घेण्यात येईल अशी ग्वाही दिली.

मुंबई येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यामध्ये ऋषी ओबेरॉय, अशोक गायकवाड व सचिन घनवट या मुंबईस्थित माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. डॉ. नारायण आपटे यांनी सुत्रसंचालन केले. कार्यक्रमानंतर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले अभिजित घाडगे यांच्या संगीत रजनी कार्यक्रम झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद व इतर सर्व सदस्य तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे मार्गदर्शन लाभले.

# ‘वालचंद’ महाविद्यालयाच्या जागतिक माजी विद्यार्थी मेळाव्यास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : हीरकमहोत्सव साजरा केलेल्या आणि जागतिक पातळीवर ओळख निर्माण केलेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहात झाला. देशाच्या विविध भागातील २००हून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी स्वागत केले. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी प्रगतीचा आढावा घेतला. प्रा. संजय धायगुडे यांनी माजी विद्यार्थी व माजी शिक्षकांचा सन्मानाची परंपरा सुरू केल्याचे सांगितले.

यावेळी शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुभाष आवळे यांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान




मुंबई येथील वालचंद महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात सदाशिव साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उदय नानिवडेकर व अन्य उपस्थित होते.

केला. माजी शिक्षकांमधून माजी प्राचार्य डॉ. पी.जे. कुलकर्णी, माजी विद्यार्थी सदाशिव साळुंखे यांना पुरस्कार प्रदान केला.

अध्यक्षीय भाषणात चकोर गांधी यांनी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य अमोल चव्हाण, ऋषी ओबेरॉय, अशोक गायकवाड, सचिन घनवट, प्रा. डॉ. नारायण आपटे, अभिजित घाडगे आदी उपस्थित होते.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे उत्साहात झाला. देशाच्या विविध भागातील सुमारे २०० माजी विद्यार्थी या मेळाव्याला आवर्जून उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी सुरुवातीस सर्वांचे स्वागत केले. प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी प्रगतीचा आढावा घेतला. शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ कै. डॉ. सुभाष आवळे यांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

उद्योग क्षेत्रातून हा पुरस्कार उद्योजक प्रभाताई कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. दुसरा पुरस्कार एपी ग्लोबलचे अध्यक्ष अभिजित पवार यांना प्रदान करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात चकोर गांधी यांनी इतकी थोर परंपरा असलेल्या महाविद्यालयाच्या भावी प्रगतीविषयी खात्री व्यक्त करतानाच, माजी विद्यार्थ्यांशी अधिक परिणामकारक आणि कृतिपूर्ण संवादावर भर दिला. प्रा. डॉ. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच आभार व्यक्त केले. संयोजन ॲडमिनीस्ट्रेटीव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद व इतर सर्व सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.




**सांगली : वालचंद महाविद्यालयातील माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना अध्यक्ष चकोर गांधी.**

# श्रीनिवास पाटील यांना 'वालचंद'चा बांधकाम क्षेत्रातील पुरस्कार

## वालचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेकडून सन्मान

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** हिरक महोत्सव साजरा केलेल्या सांगली येथील जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केलेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयांचा जागतिक माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा पायाभूत सेवा, बांधकाम क्षेत्रातील पुरस्कार सोनई इन्फाचे चेअरमन, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, सांगली येथील प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक श्रीनिवास पाटील यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चकोर गांधी होते.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे नुकताच संपन्न झाला. देशाच्या विविध भागातील सुमारे २०० माजी विद्यार्थी या मेळाव्याला आवर्जून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी सुरुवातीस सर्वांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रा. संजय धायगुडे, अधिष्ठाता यांनी पुरस्कार निवड प्रक्रिया सविस्तर विशद केली.




श्रीनिवास पाटील यांचा सत्कार करताना चकोर गांधी व इतर.

श्रीनिवास पाटील यांनी सांगलीत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता नोकऱ्या देण्याची भूमिका घेत व्यवसाय सुरू केला. त्यांनी पुणे ते मिरज रेल्वे डबलिंग मार्गाचे २८० कि.मी काम केले आहे. या रेल्वे मार्गावरील नांद्रे येथिल सर्वात मोठ्या ब्रिजचे काम आठ महीन्यात पूर्ण केले. शेणोली ते मिरज, कल्याण ते कसारा हेही काम पूर्ण केले. बळ्ळारशा, चंद्रपूर येथिल रेल्वेचे कामही अल्प वेळेत केले. पोलिस हौसिंगच्या कामातही श्री पाटील यांनी आपला ठसा उमटवला आहे. सांगली पोलिस मुख्यालयाचे काम त्यांनीच केले असुन इचलकरंजी, सातारा, कोल्हापूर, आटपाडी, कडेगाव, रत्नागिरी आदी ठिकाणीही पोलिस विभागाची कामे ते करत आहेत. कॉंक्रीटमधील नवी टेक्नालॉजी वापरत अनेक कामे ते सध्या करत आहेत.

सातारा जिल्ह्यातील माण खटाव विधानसभा मतदारसंघातील आंधळी डॅमचे आव्हानात्मक कामही त्यांनी अगदी कमी वेळेत पूर्ण करत आपल्या कामाचा ठसा राज्यभर उठवला. सध्या त्यांच्या उद्योग समुहातील विविध कंपन्यांमध्ये १५०० ते २००० कर्मचारी कार्यरत असुन त्यामध्ये ३० ते ४० टक्के जिल्ह्यातील तरुणांना संधी दिली आहे. अंध व्यक्तींना मदत करण्यासह विविध सामाजिक कामातही त्यांचे योगदान असुन अंध व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे प्रशिक्षण देत त्यांनी तयार केलेले प्रोडक्ट्स विक्रीसाठी मदत करण्याचा प्रकल्प सध्या हातात घेतला आहे.

यावेळी अध्यक्षीय भाषणात चकोर गांधी यांनी इतकी थोर परंपरा असलेल्या महाविद्यालयाच्या भावी प्रगतीविषयी खात्री व्यक्त केली. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील यांनी महाविद्यालयाच्या अडचणीच्या काळात माजी विद्यार्थ्यांनी बजावलेल्या निर्णायक भूमिकेचा विशेष उल्लेख करीत येथून पुढच्या काळात देखील महाविद्यालयाच्या पाठीशी माजी विद्यार्थी सर्व प्रकारे नेहमीच उभे राहतील याची खात्री दिली. प्रा. डॉ. नारायण आपटे यांनी सुत्रसंचालन केले तसेच आभार व्यक्त केले.

लोकमत

प्राईड सांगली

स्टुडन्ट धमाका

# सांगलीचा मानबिंदू वालचंद




सांगलीच्या अनेक मानबिंदूंपैकी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय हे एक. आजमितीला जगाच्या पाठीवर असा एकही देश नसेल, की जेथे वालचंदचा विद्यार्थी नाही. 'आम्ही राष्ट्र घडवतो, आम्ही जग उभारतो' अशी बिरुदावली अभिमानाने मिरविणारे तब्बल २५ हजारांवर अभियंते येथे घडलेत. 'कर्मसु कौशलम्' हे ब्रीद घेऊन धोंडूमामा साठे यांनी स्थापन केलेले 'न्यू इंजिनिअरिंग कॉलेज' म्हणजेच आजचे वालचंद. स्वातंत्र्यपूर्व भारतातील हे पहिले खासगी महाविद्यालय आज सांगलीचा लौकिक वाढवत आहे.

विश्रामबागमध्ये ९० एकरांमध्ये वालचंदचा 'कॅम्पस' आहे. महाविद्यालयासाठी धोंडूमामांनी महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. सांगली संस्थानचे राजे चिंतामणराव पटवर्धन यांनी आर्थिक मदत दिली. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांनी विकायला काढलेली विलिंग्डन महाविद्यालयासमोरील सैनिक कॅम्पची सध्याची जागा घेतली. २३ मार्च १९४७ रोजी राणीसाहेब सरस्वतीदेवी पटवर्धन यांच्या हस्ते मुहूर्तशिला बसविण्यात आली. २३ जून १९४७ रोजी प्रत्यक्ष शिक्षणास प्रारंभ झाला. २९ नोव्हेंबर १९४७ रोजी मुंबई इलाख्याचे पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या हस्ते अधिकृत उद्घाटन झाले. पहिल्या वर्षी फक्त ३० विद्यार्थ्यांना परवानगी मिळाली.

पुढे आर्थिक अडचणीवेळी वालचंद उद्योग समूहाने मदत दिली. १९५५ मध्ये शेठ वालचंद हिराचंद यांचे नाव देण्यात आले. तेव्हापासून वालचंद महाविद्यालय अशी ओळख झाली.

सध्या ६ पदवी, १० पदव्युत्तर, तर ४ पदविका अभ्यासक्रम सुरू आहेत. २८०० विद्यार्थी, २०० हून अधिक शिक्षकेतर कर्मचारी व १६० हून अधिक शिक्षक आहेत. तब्बल २७ विविध पेटंट शिक्षकांच्या नावावर आहेत. देश-विदेशातील नामवंत कंपन्या विद्यार्थ्यांना सेवेत घेण्यासाठी येत असतात.

कुपन क्र. २३

सांगलीतील वालचंद महाविद्यालयाची स्थापना कोणी केली?

- वालचंद हिराचंद ☐
- अजित गुलाबचंद ☐
- धोंडूमामा साठे ☐




मुंबई : श्रीनिवास पाटील यांचा सत्कार करताना चकोर गांधी व अन्य.

# वालचंद गौरव पुरस्काराने श्रीनिवास पाटील यांचा सन्मान

सांगली, ता. २२ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या जागतिक माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा पायाभूत सेवा, बांधकाम क्षेत्रातील 'वालचंद गौरव पुरस्कार २०२४' 'सोनाई इन्फ्रा'चे चेअरमन, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष; तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष बांधकाम व्यावसायिक श्रीनिवास पाटील यांना प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी चकोर गांधी होते.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा जागतिक माजी विद्यार्थी मेळावा मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सभागृहात झाला. देशाच्या विविध भागातील सुमारे २०० माजी विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी स्वागत केले. प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे यांनी पुरस्कार निवड प्रक्रिया विषद केली.

स्थापत्य अभियांत्रिकी पदवी घेतल्यानंतर पाटील यांनी व्यवसाय सुरू केला. अंध व्यक्तींना मदतीसह सामाजिक कामातही योगदान आहे. अंध व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभारण्याचे प्रशिक्षण देत उत्पादन विक्रीसाठी मदत करण्याचा प्रकल्प आहे.